
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. नं. २५९
१८०९

# श्रीबद्रीकेदार-नारायण

# यात्रा वर्णन



REFBK-0010797

प्रकाशन पुणे २

तळहातावरील रेषा व त्यांच्या परस्पर संयोगामुळें
सांधलीं जाणारीं विविध चिन्हें ही एक
सांकेतिक लिपी आहे.

ही लिपी वाचतां येणाराला—

१. भूत, भविष्य, वर्तमान आदि त्रिकालांचें
ज्ञान तर होऊं शकेलच, शिवाय—

२. स्वतःच्या व इतरांच्या स्वभावाची
अचूक ओळख व्हावयास, तसेंच—

३. जीवनांतील भावी शिक्षणक्रम, आणि

४. जिवलग जोडीदाराची निवड करण्यास

जर हस्तसामुद्रिक विद्येच्या अध्ययनाची मदत अचूक होत
असेल तर ही विद्या आत्मसात करून घेणें
किती उपयुक्त ठरेल बरें ?

## हस्तसामुद्रिक विषयाचें सांगोपांग शिक्षण

घरीं बसल्या संपूर्ण घेतां यावें या-
करितांच खास लिहिलेलीं उद्‌बोधक
व संग्राह्य पुस्तकें

## सुलभ सामुद्रिक विवेचन

(भाग १ ते ४)

लवकरच प्रसिद्ध होत आहेत.

# श्रीबद्रीकेदार—नारायण

# यात्रा-वर्णन

[ पुष्प ७ वें ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६९५६

लेखक—लक्ष्मण केशव तांबे



REFBK-0010797

ब्रह्मलिखित प्रकाशन, पुणे २

डिसेंबर ] मूल्य सव्वा रुपया [ १९५९

– प्रकाशक –
सौ. लता तांबे
वेस्टर्न इंडिया सदन
१९७/३ टिळकरोड
पुणें २.

[ या ग्रंथाचे सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन आहेत. ]

शुद्धलेखन :— श्री. गो. पुराणिक, शिक्षक, न्यू इं. स्कूल,
टिळक पथ, पुणें २

– मुद्रक –
अ. वा. गोखले
उदय प्रिंटिंग प्रेस
टिळकरोड
पुणें २



श्री. दत्तात्रय दिगंबर ऊर्फ दादासाहेब कुलकर्णी,
संचालक, "दत्त दिगंबर यात्रा कंपनी" यांना
माझी ही वाङमयीन कृति मी स्नेहभावानें
समर्पण करीत आहे.

— ल. के. तांबे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६१५४ विः भू-प्रवास
क्रमांक ~~९५०२~~ नों: दि: ५।२।६०
२५

श्री

# बदरी–केदार–नारायण

# यात्रा-वर्णन

दा. क्र. १०७९७

पुण्या-मुंबईसारख्या शहरांतून दत्तदिगंबर यात्रा कंपनीचा लौकिक अनेक नामवंत मंडळींच्या मुखावाटें मी ऐकत होतों. कंपनीचे संचालक श्री. दत्तात्रय दिगंबर ऊर्फ दादासाहेब कुलकर्णी यांचा व माझा परिचय दोन-अडीच वर्षांपूर्वी घडून आला होता. इतकेंच नव्हे तर गुणसाधर्म्यामुळें मध्यंतरींच्या या कालांत आम्हां उभयतांत स्नेहही निर्माण झाला होता. त्यामुळें कंपनीची कोठेंही सहल निघाली कीं मला त्या सहलींत सामील व्हावयाचा त्यांनीं आग्रह करावा व मीं नाहीं म्हणावें, अशा तऱ्हेचा जमाना मध्यंतरींच्या दोन वर्षांत सतत चालू होता. अशांतच कांहीं निवडक मंडळींच्या खास आग्रहाखातर बदरीकेदार व बदरीनाथ या ठिकाणीं दि. २ मे १९५९ला सहल काढावयाचें दादासाहेबांनीं निश्चित केलें. तदनंतर नेहमींप्रमाणें या सहलीबाबत त्यांनीं मला शब्द टाकला. हिमालय विभागांतील दोन पवित्र व निसर्गसुंदर तीर्थक्षेत्रें पाहावयाची दुर्मिळ संधि अचानक पुढें आली होती ती डावलून टाकावी असें मला वाटेना. माझ्या मनांतील चलबिचल दादासाहेबांनीं तत्क्षणीं ओळखली. माझ्या सर्व अडचणींचें त्यांनीं निराकरण केलें. अखेर त्यांच्या मुशाफरींत सौभाग्यवतीसह जाऊन सामील होणें मला क्रमप्राप्त ठरलें. भारतास ललामभूत असणाऱ्या

हिमालयासारख्या अद्वितीय पर्वताचे दर्शनाचा अपूर्व योग माझ्या जीवनांत येणेंप्रमाणें अनायासें जुळून आला आणि तो मीं जास्तींत जास्त प्रमाणांत साधलाही.

प्रवासाला सदैव उत्सुक असणारें माझें मन हिमालय प्रदेशांतील दौरा कायम केल्यावर आनंदानें अगदीं बहरून गेलें. त्या अति-दूरस्थ व अवघड यात्रा–प्रवासाकरितां आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तू मीं खरेदी केल्या. स्टीलची मजबूत बॅग, सूटकेस, होल्ड-ऑल, वॉटर बॅग, लोंकरीचा स्वेटर, हातमोजे, पायमोजे, खाकी चड्डी, हवा भरून तयार होणाऱ्या उशा, कॅन्व्हासचे बूट, मेण-कापड, विजेरी, मेणबत्त्या आदि वस्तू एका दिवसांत मीं गोळा केल्या. सुकामेवा, लेमनड्रॉप्स, बिस्किटें, पेटंट औषधें, लवंग-वेलदोडा व सुपारी यांसारख्या खाद्योपयोगी वस्तूही दुसऱ्या दिवशीं मीं विकत आणल्या. टायफॉइड व कॉलरा यांचीं ध्यावीं लागणारीं इंजेक्शन्स आम्हीं उभयतांनीं टोंचून घेतलीं व मोठ्या उत्कंठेनें निघावयाच्या दिवसाची आम्ही वाट पाहूं लागलों. तो दिवस अखेर उजाडला एकदांचा !

दि. २ मे १९५९, वार शनिवार, वेळ रात्रीं नवाची. बोलून चालून न 'करत्याचा वार' होता तो. बदरीनारायणाची यात्रा घडावयाचा योग फार थोड्या माणसांच्या जीवनांत व तोही एकदांच यावयाचा. या वस्तुस्थितीमुळें सहसा न घडणारी गोष्ट नेमकी शनिवारींच घडून येत असलेली पाहून त्या योगायोगाचेंही मला नवल वाटलें.

घरांतून निघतांना तर जणूं कांहीं देहातीत अवस्थेंतच कांहीं क्रिया मजकडून आपोआप घडून आल्या. कुलस्वामिनीस मीं वंदन केलें. घरांतील सर्व वस्तुमात्रांवर प्रेमळ दृष्टि टाकून मायापाशांत गुंतविणाऱ्या त्या सर्व गोष्टी स्मृति-संपुटांत मीं सांठविल्या.

थोरल्या चिरंजिवांचा वियोग जाणवणार या कल्पनेनें त्यांचा निरोप मीं मोठ्या कष्टानें घेतला. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या सस्नेह शब्दांना यथोचित उत्तरें देऊन त्यांच्या परिवारांतून सोडवणूक करून घेतली. या साऱ्या क्रिया मजकडून यंत्रवत् घडून आल्या. वियोगाच्या दु:खानें आणि प्रवासाच्या आनंदानें उलट-सुलट हेलावणारें माझें मन त्या क्षणीं इतकें बधीर बनलें होतें कीं मी काय करीत होतों तें माझें मलाच कळलें नाहीं.

दारापुढें आलेल्या टॅक्सींतून आम्ही उभयतां पुणें स्टेशनावर जाऊन दाखल झालों. चिरंजीवही बरोबर होतेच. शेजारचीं चार माणसें आमच्या मागोमाग बसनें स्टेशनवर आलीं होतीं. यात्रा कंपनीचा रेल्वेचा खास डबा उभा होता तेथें जाऊन सामान चढविलें व त्या डब्यांत जाऊन आम्ही बसलों. सायंकाळपासून आभ्राच्छादित असणाऱ्या आकाशांतून पावसाच्या धारा गळं लागल्या.

प्रवासाला निघण्यापूर्वीं कंपनीच्या वतीनें श्रीदत्त प्रभूच्या फोटोपुढें मोठ्या समारंभानें आरतीचा कार्यक्रम उरकला. तद-नंतर निरोप द्यावयास आलेल्या पुष्कळशा मंडळींसुद्धां सर्वांना प्रसाद वांटण्यांत येऊन कॉफीही देण्यांत आली. अंमळशानें गाडीची वेळ झाली. निरोप घेतांना आम्हां उभयतांचीं अंत:करणें सद्-गदित झालीं. आम्हां सर्वांच्या डोळ्यांतून अश्रू उभे राहिले. गाडी चालू झाल्यावर आप्तेष्ट खालीं प्लॅटफॉर्मवर राहिले. दृष्टीच्या टप्प्यापलीकडे ती मंडळी गेल्यावर आमच्या खिन्न नजरा अधोमुख बनल्या. अश्रू सुकून गेले. बाहेर पाहिलें तों आकाश जरी निवळलें नव्हतें तरी पावसाची सर पूर्णपणें थांबली होती.

यात्रा कंपनीच्या त्या खास डब्यांत प्रवाशांसाठीं दोन बाजूंस

दोन मोठीं दालनें आणि मधोमध एक छोटा कंपार्टमेंट होता. मोठ्या दालनांतून प्रत्येकीं १६ माणसें व छोट्या कंपार्टमेंटमध्यें ८ माणसें या हिशेबानें त्यांत एकूण ४० प्रवाशांची बसा-निजावयाची सोय होती. आमच्या दालनांत फक्त बारा माणसें होतीं. त्यांचीं नांवें परिशिष्ट 'अ'मध्यें दिलीं आहेत.

पुणें स्टेशन व निरोप द्यावयास आलेली आप्तेष्ट मंडळी यांना सोडल्यावर स्नेहशून्य बनलेल्या आमच्या नजरा डब्यांतील इतर मंडळीकडे स्वाभाविकपणें वळल्या. परस्परांना परस्परांशीं बोलण्याची अनिवार इच्छा झाली. प्रास्ताविक भाषणाच्या फैरींत परस्परांतील असणारें बरेचसें गुणसाधर्म्य व्यक्त झालें. आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं कल्याण स्टेशन सोडण्याचे आंत आमच्यांतील सलोखा एवढ्या त्वरेनें वाढत गेला कीं जणूं कांहीं एकाच कुटुंबांतील माणसें एकत्र झालीं आहेत असें इतरांना भासूं लागलें.

शनिवारीं रात्रीं आम्हीं पुणें सोडलें. रविवारीं रात्रीं आम्हीं भुसावळ स्टेशन गांठलें. पुणें ते भुसावळपर्यंत आमचा डबा पॅसेंजरला जोडला गेला होता. भुसावळ ते दिल्ली या दरम्यानचें अंतर आमचा डबा पंजाब मेलला जोडण्यांत आल्यानें आम्हीं लवकर काटलें. दिल्ली ते हरिद्वार हा प्रवास मसुरी एक्सप्रेसला आमचा डबा जोडण्यांत येऊन आम्हीं पार पाडला. हरिद्वार स्टेशनवर मंगळवार दि. ५ मे ला सकाळीं आम्ही पोंचलों. एक दिवस तेथें मुक्काम केला. बुधवारीं सकाळीं आम्ही हृषीकेश स्टेशन गांठलें. त्याच ठिकाणीं आमच्या रेल्वे प्रवासाची अंतिम सीमा परिपूर्ण झाली.

एवंच, पुणें ते हृषीकेश या प्रवासाप्रीत्यर्थ चार रात्री व तीन दिवस लागले. दत्तदिगंबर कंपनीच्या सुखसोयी, दादासाहेबांची दक्षता, विशेषत: त्यांचा हजरजबावी व मनमोकळा स्वभाव,

आमच्या कंपार्टमेंटमध्यें एकत्र आलेली विवक्षित बारा मंडळी व त्या बारा जणांमध्यें अल्पावधींतच निर्माण झालेला विस्मयजनक सलोखा या सर्वांचें प्रत्यंतर अवघ्या तीन दिवसांत एवढ्या अपूर्वाईनें येत गेलें कीं त्याचें सविस्तर वर्णन करणें सर्वतोपरी अशक्य आहे.

यात्रा कंपनीच्या खास डब्यांत तीन दिवस लाभलेला ऐष-आराम जितका अपूर्व तितकाच मनपसंत होता. तो रेल्वेचा डबा नसून सर्व सुखसोयींनीं सुसज्ज असणारें धांवतें पळतें घर होतें. स्नानापासून तो शयनापर्यंत आणि चहा-कॉफीपासून तो पंच-पक्वान्नाच्या भोजनापर्यंत सर्व प्रकारची व्यवस्था कोणत्याहि वेळीं करतां यावी असें तें सर्वांग परिपूर्ण पण इष्टस्थळीं नेऊन सोडणारें सिद्ध रथवाहनच होतें यांत शंका नाहीं.

प्रातःकाळीं निजून उठतांक्षणीं पुढें चहाचा कप, तदनंतर दोन तासांनीं पोहे वा शिरा यांसह पुन्हा चहा, अकरा वाजतां घडीच्या टेबलावर स्टेनलेसच्या पात्रांतून वरण-भातासह चारी-ठाव चमचमीत जेवण, दुपारीं ४ वाजतां मधल्या वेळचा चहा आणि रात्रीं ८ वाजतां दुपारच्या धर्तीवर मिळणारें ताजें व गरमगरम जेवण. स्नान उरकल्यावर वस्त्र-प्रावरणें धुण्याची, निजावयाची वेळ होतांच बिछाना घालण्याची वा सकाळीं निजून उठल्यावर अंथरूण गुंडाळून ठेवण्याची तकलीफ आपल्याला बिलकूल नाहीं. हीं सारीं कामें सेवकांवर सोंपविलेलीं. त्यामुळें स्वतःच्या घरीं कदापिही न घडेल अशा प्रकारची चोख व्यवस्था त्या ठिकाणीं असल्यानें निदान मला तरी निरंतरचा ‘ प्रवासी ’च व्हावेसें वाटूं लागलें खरें !

विशेषतः या सर्व सुखसोयींच्या भरीस डब्यांत अचानक भेट-लेल्या सहप्रवाशांच्या खेळीमेळीच्या वर्तनाची अमोल भर पडल्या-

वर मग काय विचारावें ? **बाळासाहेब बहुधनी** लाघवी व जात्याच विनोदी स्वभावाचे होते. **नानासाहेब वैद्य** मोजके पण मार्मिक बोलत. **सवाई वकीलांच्या** संभाषणांत बहुश्रुतपणा व परहित तत्परता यांचें मनोहर मिश्रण आढळे. **सौ. कुसुमताईनीं** माफक बोलण्याचा जरी निर्धार केला होता तरी त्यांची बोलकी जन्मजात वृत्ति वारंवार त्यांना बोलावयास भाग पाडी. आणि सर्वांवर ताण करणारी गोष्ट म्हणजे सुमारें पाऊणशें वर्षांच्या **ती गं. भा. आजीबाई मुदखेडकर** या आचारानें जरी सोवळ्या दिसत होत्या तरी बोलण्यासंवरण्यांत आमच्यामध्यें बरोबरीनें सामील होऊन अशा प्रकारचें प्रसन्न वातावरण वारंवार त्या निर्माण करीत कीं जेवणा-खाण्याव्यतिरिक्त बाकीच्या वेळेचें भानच आम्हांला रहात नसे.

पुणें सोडल्यावर तिसऱ्या दिवशीं म्हणजे मंगळवारीं दि. ५ ला सकाळीं हरिद्वार स्टेशनवर आम्ही उतरलों. दरम्यानच्या प्रवासांत नासिक, भुसावळ, सांची, झांशी, ग्वाल्हेर, आग्रा, मथुरा, वृंदावन, दिल्ली आदि अनेक सुप्रसिद्ध रेल्वे स्टेशनें वाटेंत आम्हांला लागलीं. तसेंच आजूबाजूस विविध प्रकारचे निसर्गाचे व मानवनिर्मित स्थळांचे देखावेही आढळले. पण ज्या सौंदर्य-महोदधीच्या दर्शनास मी निघालों होतों त्याच्या तुलनेपुढें वाटेवरील कोणत्याही दृश्याचें वर्णन कःपदार्थ ठरण्याजोगें असल्यानें त्याची दखल या ठिकाणीं मीं न घेतलेली बरी.

**हरिद्वार:**—हें आमच्या यात्रा-विभागाचें प्रवेशद्वार ! मौज अशी कीं हरिद्वारला बिर्ला घाटावर अक्षरशः धांवतच जाऊन गंगामाईचें जेव्हां मीं प्रथमतः दर्शन घेतलें तेव्हां तेथील ऐश्वर्यानें मी एवढा स्तिमित झालों कीं पुढील सर्व यात्रा जणूं कांहीं मंत्रमुग्ध स्थितींतच मीं पार पाडली. नंतरच्या अठरा-एकोणीस दिवसांत नित्य नव्या स्थळीं माझा देह प्रत्यक्ष जरी संचारत होता आणि त्या अवधींत निसर्गाची अलौकिक संपदा चढत्या क्रमांत प्रत्यक्ष पहाण्याचें

अहोभाग्य मला लाभलें असतांही जणुं कांहीं एका रमणीय स्वप्नांतच मीं दीर्घकाल तें सारें दिव्य ऐश्वर्य अवलोकिलें असें आज मला वाटत आहे.

हरिद्वार येथील बिर्ला घाटावर दोहोंबाजूंनीं वाहणाऱ्या गंगामाईच्या ऐश्वर्याचें वर्णन माझ्यासारख्या अप्रबुद्धानें कसें करावें ? त्या स्थळीं प्रत्यहीं सायंकाळीं होणाऱ्या आरती सोहळ्याची शोभा शब्दानें यथार्थ पटवून देतां येणें तर सर्वतोपरी अशक्यच होय ! बिर्ला शेटजींनीं गंगामाईच्या दोन प्रवाहांच्या मधोमध असणाऱ्या घाटावर चारी बाजूंस घड्याळें असणारा एक उंच मनोरा बांधला आहे. या घाटाच्या अलीकडील बाजूस असणाऱ्या ब्रह्मकुंडांतून गंगेच्या प्रवाहाचा एक ओघ शक्य तो त्याचा वेग कमी करून वाहता ठेवण्यांत आला आला आहे. ब्रह्मकुंडाची खोली चार-साडे चार फूट आहे. आंत उतरावयास पायऱ्या आहेत.आणि पात्रांतील पाण्याचा वाहता वेग जरी कमी केला असला तरीही तो एवढा जबरदस्त आहे कीं मुद्दाम बसविण्यांत आलेल्या लोखंडी साखळदंडांचा आश्रय न घेतां कुंडांत उतरून बुचकळी घेऊं पाहणारा माणूस प्रवाहपतित बनून केव्हां गंगेच्या उदरांत कायमचा गडप होईल याचा नेम नाहीं. ब्रह्मघाटाच्या अलीकडे श्रीहरीचें व गंगामाईचें अशीं दोन छोटीं देवळें जवळजवळ आहेत. हरिद्वार हें सप्तपुऱ्यांपैकीं एक स्थान असून ब्रह्मघाटालाच '**हरी की पायरी**' असें मानण्याचा प्रघात आहे. ब्रह्मघाटाच्या पलीकडे कुशाघाट आहे. त्या ठिकाणीं श्रीगुरुदेव-दत्तात्रेय यांचें तपस्यास्थान आहे.

ब्रह्मकुंडावर सकाळीं दहा वाजतां गंगामाईच्या पवित्र जलाशयांत अभिवादनपूर्वक मी आपली काया पांच-सातवेळां खळबळून धुतली. कायेबरोबर मन व अंतर्याम जास्तींत जास्त निर्मळ बनविण्याचा कसून यत्न केला. वाड-वडील, आप्तेष्ट, स्नेही-सोबती यांच्यांतील कांहींचीं नांवें मुखावाटें उच्चारून 'त्या सर्वांनाही

पावन कर' अशी गंगामाईची मीं मनोभावें प्रार्थना केली. मनांत कोणताही संकल्प नसल्यानें ब्राह्मणाकरवीं तो सोडण्याचें प्रयोजन मला मुळींच नव्हतें. गंगाजलाच्या स्पर्शसुखांत व तिच्या रम्य तीरावर असेतोंपर्यंत दिव्यानन्दाखेरोज माझें चित्त इतरत्र कशांतही नव्हतेंच मुळीं !

आमच्यांतील कांहीं मंडळींनीं हरिद्वार येथील गंगामाईस रामेश्वरहून आणलेला सेतु विधिपूर्वक समर्पण केला व कांहीं सुवासिनींनीं गंगामाईची पूजा करून तिची खणानारळांनीं ओटी भरली.

बिर्ला घाटाच्या पलीकडून गंगेचें विस्तृत पात्र अत्यंत शीघ्र गतीनें वाहात असलेलें दिसून येतें. पाण्याचा वेग व पृष्ठभागावरील लाटांची गति एवढी विलक्षण असते कीं त्यावर नजर ठरत नाहीं. गंगेचें पाणी इतकें शीतल व निर्मळ असतें कीं आपल्या स्पर्शानें तें खराब तर होणार नाहीं ना अशी धास्ती आपणाला वाटत असते.

सायंकाळीं प्रत्यही त्या स्थळीं होणारा आरतीचा सोहळा पाहावयासाठीं एक दिवस मुद्दाम हरिद्वार येथें आम्हीं मुक्काम केला. बर्फावरून चालतांना हातीं धरावयाच्या काठ्या व लोकरीचीं वस्त्रें दुपारीं बाजारांत हिंडून खरेदी केलीं. आणि सायंकाळीं सुमारें सहा वाजतां बिर्ला घाटावर जाऊन आम्ही दाखल झालों. घाटावर फुल-माळ्यांचीं दुकानें बरींच होतीं. एका दुकानांतून छोट्या नौकेच्या आकाराचे रंगीबेरंगी फुलांनीं भरलेले कर्दळीच्या पानांचे द्रोण आम्हीं खरेदी केले. पुष्पांच्या ढिगांमध्यें त्याच द्रोणांत तेलवातीची सोय केलेली होती. तें पुष्प-वातीयुक्त द्रोण बिर्ला घाटावर नेऊन आरतीला प्रारंभ होण्यापूर्वीं त्यांतील वाती पेटवून आम्ही एका मागोमाग गंगेच्या प्रवाहावर सोडून दिले.

बिर्ला घाट त्या वेळीं स्त्री-पुरुषांनीं अक्षरशः फुलून गेला होता. वेगवेगळ्या प्रांतांतील चित्रविचित्र पद्धतीच्या वेषभूषेंतील आणि विविध भाषा बोलणारीं माणसें त्या ठिकाणीं गोळा झालीं होतीं. कोणी उभीं होतीं. कोणी बसलीं होतीं व कोणी हिंडत होतीं, खाद्यपेयांवर कांहींजण ताव मारीत होतीं, कांहींना देवदर्शनाची त्वरा होती तर कांहीं आमच्याच ओळींत येऊन गंगेच्या प्रवाहांत पुष्प-वातीयुक्त नौका हलक्या हातांनीं सोडीत होतीं. आम्हीं व इतर अनेकांनीं एकामागोमाग सोडलेल्या दीपनौका गंगामाईच्या अंकावरून डुलतडुलत वेगानें पुढेंपुढें सरकत होत्या. पाण्याच्या पृष्ठभागावरून पुढें सरकत जाणाऱ्या दीपज्योतींची अखंड रांग पाहून आकाशांतील नक्षत्रेंच जणू कांहीं पावन होण्याकरितां खालीं गंगामाईच्या प्रवाहांत अवतरलीं असावींत असें वाटलें. सायंकाळच्या संधि प्रकाशांत पाण्यावर वेगानें ठुमकत जाणाऱ्या त्या इवल्याशा ज्योतींचा पाठशिवणीचा खेळ प्रत्येकजण मनसोक्त पाहात होता. क्वचित् दोन द्रोण वाहतां वाहतां शेजारीं शेजारीं येत, प्रारंभीं शेजारी शेजारी असणारे द्रोण पुढें अल्पावधींत दूर दूर होऊन वेगवेगळ्या दिशांना लागत तर कित्येक दीपनौकांना थोडयाफार अंतरावर कलंडल्यानें तत्काळ जलसमाधि मिळे. मीं मनांत म्हटलें, 'मानवी जीवनाची तऱ्हाही थेट अशीच नाहीं काय?'

येणेंप्रमाणें गंभीर विषयाचें चिंतन मी करूं लागतों न लागतों तोंच गंगामाईची आरती पलीकडील मंदिरांत सुरू झाली. सर्व जनसमूह ताबडतोब उभा ठाकला. जात, भाषा वा वेष या सर्वांतील विषमता निमिषार्धांत नष्ट होऊन गंगामाईच्या प्रेमादराची एकमेव भावना सर्व मानवी हृदयांतून प्रगटली. जुळलेले हात हृदयाजवळ नेऊन प्रत्येकानें मनःपूर्वक वंदन केलें. आरतीचा समारंभ सुमारें वीस मिनिटें सुरू होता. पलीकडच्या तीरावर तीन पुजारी हातीं प्रज्वलित पंचारत्या घेऊन गंगामाईला ओवाळीत होते. आरतींतील काव्यरचना कोणाच्याहि परिचयाची

नव्हती. त्यामुळें झांजा, टाळ, घंटा वा शिंगांची ललकारी यांच्या नादाखेरीज बहुजनसमाजाला दुसरें कांहींही ऐकू येत नव्हतें. आणि तरीही जात्याच श्रद्धाळू असणारीं तीं सारीं माणसें वीस मिनिटें मंत्रमुग्ध बनून अगदीं स्तब्ध राहिलीं होतीं. मानवांतील दिव्यत्व व्यक्त करणारें तें अपूर्व दृश्य पाहून मी आंतल्याआंत अगदीं विरघळून गेलो.

त्याच दिवशीं भोजनोत्तर दुपारीं २ ते ५ या दरम्यानच्या कालांत टांगे करून हरिद्वार येथील पुढील स्थळांना आम्ही भेट देऊन आलों होतों.

**कनखल तीर्थ :—** हें स्थान हरिद्वार स्टेशनपासून दक्षिणेस सुमारें तीन मैलांवर आहे. भागीरथी आणि नीलधारा या नद्यांचा संगम त्या ठिकाणीं झाला आहे. दक्षेश्वर मंदिर, बिल्वकेदार व दक्षयज्ञकुंड यांचीं दर्शनें त्या ठिकाणीं घडलीं. प्रजापतीनें पौराणिक कालीं त्या ठिकाणीं महायज्ञ आरंभिला. आणि पार्वतीच्या वर-संशोधनार्थ शंकरांना वगळून बाकीचे सर्व गणगोत गोळा केलें. तत्पूर्वींच पार्वतीनें प्रणयाधीन होऊन शंकराला वरलें असल्यानें प्रजापतीनें पार्वतीजवळ शंकराची जेव्हां निर्भर्त्सना केली तेव्हां पतीची निंदा सहन न होऊन पेटलेल्या यज्ञकुंडांत पार्वतीनें उडी टाकली. शंकरांना तें वृत्त कळतांच भयंकर राग आला व आपल्या दूतांकरवीं त्यांनीं दक्षयज्ञाचा विध्वंस करून टाकला. तेंच सुविख्यात दक्षयज्ञकुंड कनखल येथें आहे.

**गुरुकुल :—** या संस्थेची दुमजली सुंदर इमारत कनखलच्या पुढें सुमारें दीड मैल अंतरावर आहे. तळमजल्यावर प्रशस्त हॉल असून दुसऱ्या मजल्यावर आर्ट गॅलरी आहे.

**सप्तधारा व सप्त ऋषि आश्रम :—** हें ठिकाण हरिद्वार स्टेशनच्या उत्तरेस सुमारें चार मैलांवर आहे. त्या ठिकाणीं पुरातन

कालीं गंगेच्या विस्तृत पात्रांत सप्तसरोवरें नांदत होतीं व सात ऋषींनीं त्या सप्तसरोवरांच्या तीरीं तपश्चर्या केली होती असें समजलें. मला त्या ठिकाणीं सप्तसरोवरें कांहीं दिसलीं नाहींत पण सप्त-ऋषींचीं वेगवेगळीं मंदिरें उभारण्याचें काम मात्र त्या स्थळीं पुरें होत आल्याचें आढळलें. वसिष्ठ, अरुंधती, गौतम, अगस्ति आदि नांवेंही त्या मंदिरांच्या प्रवेशद्वारांवर लिहिलेलीं आहेत. सप्तकुटिरांच्या मधोमध एक विशाल मंदिर असून त्या मंदिरानजीक पंडित नेहरूंच्या हस्तें कांहीं दिवसांपूर्वीं नुकतेंच ज्याचें उद्‌घाटन झाल्याचें समजलें असा एक प्रशस्त हॉल आम्हांला पहावयास मिळाला

येणेंप्रमाणें हरिद्वार येथील इष्ट तीं स्थळें पाहून झाल्यावर दुसऱ्या दिवशीं आमचा रेल्वेचा डबा गाडीला जोडण्यांत आला व बुधवारीं सकाळीं ९ चे सुमारास आम्ही हृषीकेश येथें जाऊन दाखल झालों.

**हृषीकेश :—** हरिद्वारपासून हृषीकेश चौदा मैलांवर आहे. मोटारीनेंहि हें अंतर हवें तेव्हां काटतां येतें. रेल्वे प्रवासाचा शेवट या ठिकाणीं होत असल्यानें आमचा रेल्वेचा डबा आम्ही सर्व यात्रा आटोपून पुन: परत त्या ठिकाणीं येईपर्यंत सुमारें तीन आठवडे हृषीकेश स्टेशनवर थांबणार होता. तीन आठवड्यांकरितां लागणारी शिधा-सामग्री, भांडीं-उपकरणीं, वस्त्र-प्रावरणें यांचें वेगवेगळे डाग बनविण्यांत आले. चाळीस माणसें व त्यांचेच सुमारें शंभर डाग मुळांत होते. त्यांत कंपनीच्या तेवढ्याच डागांची भर पडली, त्यामुळें सामानाचा एवढा प्रचंड ढीग झाला कीं दोन मोटारींतील बहुतेक जागा त्यानेंच व्यापून उरलेल्या जागीं आम्हांला बसणें भाग पडलें. पायीं प्रवासाला पुढें जेव्हां प्रारंभ झाला तेव्हां सामान वाहतुकीकरितां १४ खेंचरें करावीं लागलीं. कूली-हमाली व खेंचरें यांकरितां द्यावी लागलेली एकूण रक्कम

रु. २,३०० इतकी भरली. यावरून आमच्या सामानाची आणि सामानवाहतुकीच्या खर्चाची स्पष्ट कल्पना करतां येण्याजोगी आहे.

हृषीकेशला गंगेचा प्रवाह दगड-धोंडयांतून अत्यंत वेगानें वाहात आहे. त्या ठिकाणीं नदीला घाट बांधलेला नसल्यानें पाण्यांत उतरून स्नान उरकणें मोठें धोक्याचें आहे. त्याची प्रत्यक्ष साक्ष पटावी असा प्रसंग आमच्यांतीलच एकावर तेथें घडून आला. आमच्यांत **श्री. त्र्यं. कृ. पानसरे** नांवाचे डोंबिवलीचे एक सद्-गृहस्थ होते. वयानें ते साठीच्या आसपास असले तरी शरीरानें स्थूल होते. त्यांना दम्याची व रक्तदाबाची व्यथा होती. बर्फा-प्रमाणें गार असणाऱ्या गंगेच्या प्रवाहांत स्नानासाठीं ते उतरले आणि भयंकर वेगांत वाहणाऱ्या थंडगार प्रवाहांत बुडी घेण्याचा त्यांनीं यत्न केला मात्र. तोंच पायाखालची वाळू त्यांच्या भारानें एकदम निसटली गेली आणि त्यांचा स्थूल देह त्या प्रवाहांत शब्दशः आडवा होऊन पाहतांपाहतां तो धारेलाही लागला. सुदैवानें **सवाई वकील** त्यांच्या सन्निध होते. वकीलसाहेबांनीं प्रसंगावधान राखून पानसऱ्यांचा देह तत्काळ सावरला आणि मोठ्या मिनतवारीनें त्यांना उभें करून प्राणदानाचें श्रेय सांधलें. त्या प्रात्यक्षिकान्वयें पुढील अवघड प्रवासांतील धोक्याची सूचनाच विधात्यानें जणूं कांहीं आम्हांला देऊन ठेवली असावी. पुढें ठिक-ठिकाणीं जिवाला अपायकारक ठरणाऱ्या अगणित प्रकारच्या अडीअडचणी एरवीं सावधानतेनें कदाचित् आम्हांला पार पाडतांच येत्या ना !

हृषीकेशला भरतमंदिर प्रेक्षणीय असें आहे. आश्चर्य असें कीं, भरताच्या मूर्तीला त्या ठिकाणीं चार हात आहेत. लक्ष्मणाची प्रतिमा व रामाच्या पादुका यांचेंही दर्शन त्या मंदिरांत घडून आलें. हृषीकेश स्टेशनपासून सुमारें तीन मैल अंतरावर सुविख्यात

' लक्ष्मण झूला ' नामक भागीरथीवरील भव्य पूल आहे. तो पूल ओलांडून नदीच्या पैलतीरीं गेल्यावर स्वर्गाश्रम, बाबा श्री कालीकमळीवाले यांची तिमजली प्रासादतुल्य धर्मशाळा आणि गीताभवन हीं विलोभनीय स्थळें पाहावयास सांपडतात.

बाबा श्री कालीकमळीवाले यांच्या धर्मशाळा हृषीकेशपासून पुढें चारी-धाम यात्रांच्या वाटेवर ठिकठिकाणीं आहेत. भांडीं-कुंडीं, अंथरुण-पांघरुण, दिवाबत्ती, शिधा-सामग्री एवढेंच नव्हे तर साधु-संन्याशी व अपंग अशांसारख्यांना नित्य डाळ-रोटीही या धर्मशाळाचालकांकडून पुरविली जाते. त्याशिवाय कुटुंबियांना राहण्याकरितां स्वतंत्र खोल्या धर्मशाळेंत मिळूं शकतात. उत्तराखंडांतील चारी धाम यात्रा बाबा श्रीकालीकमळीवाले यांच्या ठिकठिकाणच्या सुसज्ज धर्मशाळांमुळें अत्यंत सुकर झाल्या आहेत. सर्व धर्मशाळांची मुख्य मध्यवर्ती कचेरी हृषीकेशला गीता भवनानजीक आहे.

एकही खांब वा कमान नसणारा भागीरथीवरील 'लक्ष्मण झूला' नामक लोखंडी पूल वरच्यावर अलगद उभारलेला आहे. प्राचीन काळीं दोरखंडाच्या सहाय्यानें त्या ठिकाणीं तात्पुरता पूल तयार केलेला होता. धक्का बसतांच तो पूल डगमगे व हालूं लागे. म्हणूनच ' लक्ष्मण झूला ' या अन्वर्थक नांवानें त्याला संबोधलें जाई. आज त्या ठिकाणीं लोखंडी जाड तारांच्या दोरांनीं बांधलेला पूल आहे. अरुंद असल्यानें वाहनांच्या रहदारीस जरी तो निरुपयोगी असला तरी तो अगदीं मजबूत आहे. पंचवीस-तीस माणसांच्या भारानेंहि तो जरी हालत नसला तरी त्याचें 'लक्ष्मण झूला' हें प्राचीन नांव मात्र आजहि कायमच आहे. या पुलावरून दिसणारें गंगेचें पात्र व तिच्या दोन्ही तीरांवरील शोभा फार रमणीय आहे. गीता भवनाची सुंदर इमारत पलीकडच्या तीरावर असणाऱ्या चिरेबंदी घाटावर असून त्या ठिकाणीं गंगेच्या विस्तृत व

खोल प्रवाहावर होड्या चालतात. माणसांची ये-जा त्या होड्यां-मार्फतच या तीरापासून त्या तीराचे दिशेनें सतत चालू असते.

हृषीकेश हें त्या गांवाचें नांव पडण्याचें कारण असें समजलें. रावणाचा वध केल्यावर ब्रह्महत्या घडल्याचा दोष निवारण्या-साठीं राम-लक्ष्मणांनीं हिमालयाच्या पायथ्याशीं असणाऱ्या यात्र गंगेच्या कांठच्या गांवीं तपश्चर्या केली होती. राम-लक्ष्मण हे इंद्रियजेते होते. त्यांनीं निवडलेल्या या तपोवनाला (हृषीक्–इंद्रिय, ईश–नियंता) हृषीकेश असें नांव म्हणूनच तदनंतर प्राप्त झालें.

हृषीकेश गांव हें आकारानें ओबडधोबड व पहाडी वस्तीचें आहे. तेथें बाजारपेठ, पोस्ट व तार ऑफिस आणि दवाखाना आहे. पुढील प्रवासानिमित्त लागणारे नेपाळी कूली वा गुरखे यांना 'नेपाळी मजदूर फर्म एजन्सी 'मार्फत लेखी करारमदार करून येथूनच सोबतीस घ्यावें लागतें. एका कूलीला जास्तींत जास्त चाळीस शेर ( १ मण ) वजनाचा बोजा पाठीवरून वागवितां येतो. साधारणपणें एका मणाला एक रुपया या हिशेबानें १०० मैलांच्या जाण्यायेण्याच्या पायीं प्रवासासाठीं सामानाप्रीत्यर्थ रु. १०० इतकी हमाली द्यावीच लागते. हे नेपाळी कूली अत्यंत इमानी व काटक असतात. प्रसंगीं स्वतःचा प्राण धोक्यांत घालून यात्रिकांच्या अडीअडचणींचें ते निवारण करतात असा त्यांचा कित्येक वर्षे लौकिक आहे. मलाही त्याची सत्यता परिपूर्ण पटली आहे.


हृषीकेश गांवांत **पंडित घनेशशास्त्री चमनपूरवाले** नामक बदरीनाथाचे पंडे राहत होते. त्यांची व दादासाहेबांची दाट मैत्री होती. हरिद्वार स्टेशनवर येऊन आम्हां सर्व मंडळींशीं त्यांनीं परिचय करून घेतला. पं. घनेश यांनीं आम्हां सर्वांबरोबर

वदरीकेदार व वदरीनाथ या ठिकाणीं येण्याचें मोठ्या खुषीनें मान्य केलें. "दि गढ्वाल मोटार ट्रान्सपोर्ट यूनियन" चे ते प्रेसिडेंट असून त्यांच्या मालकीच्या दोन मोटारीही होत्या. त्यामुळें आम्हां सर्वांची वाहनासुद्धां सर्व सुखसोय त्यांनीं फार उत्तम प्रकारें ठेवली. नेपाळी कूली, दंड्या, कंड्या, घोडे वा सामानासाठीं खेंचरें सर्व कांहीं त्यांच्या मदतीमुळें ठिकठिकाणीं आम्हांला मिळूं शकलें. हृषीकेशला पंडित धनेश यांनीं आम्हां सर्वांना बिऱ्हाडीं नेऊन अल्पोपाहार दिला व आपल्या अगत्यशील आणि आर्जवी स्वभावाची साक्ष पटवून दिली. हृषीकेश स्टेशन-नजीक यात्रिकांच्या राहण्याच्या सोयीकरितां धर्मशाळा बांधण्याचें त्यांनीं आरंभिलेलें कार्य आम्हीं पाहिलें आणि पं. धनेशशास्त्री यांच्या हातून घडत असणाऱ्या सार्वजनिक सेवेचें आम्हां सर्वांनाच कौतुक वाटलें.


हृषीकेशच्या पुढील प्रवास प्रथम मोटारीनें व नंतर पायीं असा संमिश्र प्रकारचा होता. रेल्वेच्या डब्यांतील तीन दालनांत असणारीं माणसें या प्रवासाचे वेळीं एकत्र आलीं. 'रेल्वे सर्व्हंटस्' या सदराखालीं हृषीकेशपर्यंत स्वतंत्ररीत्या आलेली पांच-सात मंडळी आम्हां सर्वांमध्यें येऊन त्याच वेळीं दाखल झाल्यानें आमच्या सहप्रवाशांचा एकूण आंकडा आचारी-गडी वाढपी यांसह ५० पर्यंत गेला. त्यांतील ठळक व्यक्तींचीं नांवें परिशिष्ट 'अ'मध्यें दिलीं आहेत,

गुरुवारीं प्रातःकाळीं शौचमुखमार्जनादि विधि आटोपून व चहा घेऊन ठीक पांच वाजतां पं. धनेश यांच्या दोन मोटारींमधून सर्व सामानासह आम्हीं हृषीकेश सोडलें. डोंगर-कडांवरून व अनेक

दऱ्याखोऱ्यांतून जाणारा अति अरुंद रस्ता मोटारींनीं मोठ्या वेगानें आक्रमण्यास प्रारंभ केला. एकीकडे उंचच उंच डोंगर व दुसऱ्या बाजूस खोल असलेल्या दरींतून उड्या घेत पुढें पुढें धांवणारा गंगेचा प्रवाह एकसारखा आमची सोबत करीत होता. डोंगर-उतरणीवर पायऱ्या-पायऱ्यांप्रमाणें दिसणारीं भातखाचरें व सभोंवतीं असणारी झाडा-झुडुपांची रम्य वनश्री नेत्रांना आल्हाद-वीत होती.



— सहप्रवाशांपैकीं चार सन्मित्र —




मागील रांगः–१. (लेखक) श्री. ल. के. तांबे, २. श्री. नानासाहेब वैद्य, ३. श्री. बाळासाहेब बहुधनी.
पुढील रांगः–१. सौ. लता तांबे, २. सौ. इंदिराबाई वैद्य, ३. सौ. सुशीलाबाई बहुधनी.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६१५५ वि: भू-प्रवास
क्रमांक १८२ नों. दि. ५।२।५०



ब्रह्मकुंड : हरिद्वार



लक्ष्मणझूला : हृषीकेश

**देवप्रयाग**:–दुपारीं बाराचे सुमारास बेचाळीस मैलांवर असणाऱ्या **देवप्रयाग** येथील मोटार नाक्यावर आमच्या मोटारी थांबविण्यांत आल्या. भागीरथी, अलकनंदा व सरस्वती (गुप्त) या नद्यांचा संगम त्याठिकाणीं झालेला दिसला. संगमावर खूप पायऱ्या उतरून खालीं जावें लागतें. संगमाला घाट आहे. रघुनाथाचें, गरुडाचें व शंकराचें अशी तीन मंदिरें त्या ठिकाणीं आहेत. देवप्रयाग येथें पितृ-श्राद्ध करण्याची प्रथा आहे. आमच्यांतील **श्री. बाळासाहेब** व **श्रीमती इंदिराबाई** या दोघांना रामेश्वरहून आणलेला सेतू तेथील संगमावर विसर्जित करावयाचा होता. त्यामुळें त्यांच्यासह कांहीं मंडळी मोटारींतून उतरून संगमावर गेली. तों चढउतार करण्यास वेळ अगदींच थोडा व उन्हाची तिरीप वरून तीव्र भासत होती, त्यामुळें आम्ही बरेच जण मोटारींत बसून राहिलों होतों. नद्यांच्या संगमाचें दृश्य उग्र दिसत होतें तें आम्हीं मोटारींतूनच पाहिलें. तसेंच नद्यांच्या दोहों बाजूंस उंच उंच असणाऱ्या डोंगर-कपाऱ्यांवर देवप्रयाग गांवाची असणारी वस्ती दिसेल तेवढी बसल्याबसल्याच आम्हीं न्याहाळली.

हरिद्वार व हृषीकेश या ठिकाणीं डब्यांतील सर्व दालनांतून असणारी मंडळी प्रथमत: एकत्र आल्यावर त्या सर्वांचा परिचय हळूहळू घडून आला. त्यांत पुण्यांतील **प्राचार्य स. रा. भट** व त्यांच्या पत्नी **सौ. लक्ष्मीबाई** हीं दोघेजण होतीं. त्या दोघांचा स्वभाव मनमोकळा पण मितभाषी वाटला. कल्याण येथून आलेली पुढील मंडळी त्यांतच होती. **श्री. बापूसाहेब सबनीस वकील**, त्यांची पत्नी **सौ. पार्वतीबाई** व सासू, **श्री. राजाभाऊ भिडे**, ठाण्याचे **श्री. ह. वा. गोरे**, त्यांच्या पत्नी **सौ. इंदिराबाई**, **सौ. सरस्वतीबाई वैद्य** व त्यांच्या दोघी बहिणी, **श्री. वि. त्रि. देवधर** व त्यांच्या पत्नी **सौ. इंदुमती-बाई**, अंबरनाथचे रहिवासी **श्री. भि. गो. सरदार** व त्यांच्या पत्नी **सौ. यमुनाबाई**, हैद्राबादचे **डॉ. यशवंतराव** व त्यांच्या पत्नी

**सौ. सरस्वतीबाई**, कोल्हापूरच्या **श्रीमती हिराबाई सुर्वे**, डोंबिवलीचे **श्री. त्र्यं. कृ. पानसरे** ही सर्व मंडळी हृषीकेशला आमच्यांत येऊन सामील झाली. श्री. राजाभाऊ भिडे व श्री. पानसरे हे थट्टेखोर असून त्या दोघांच्यांतील संभाषणामुळें सर्वांची नेहमीं करमणूक होत असे. श्री. देवधर, श्री. सरदार व डॉ. यशवंतराव या तिघांचे परस्परसंबंध त्या प्रवासांत बरेचसे दृढ झालेले दिसले. हीं तीन माणसें सुस्वभावी, पारमार्थिक प्रवृत्तीचीं व अध्यात्मचर्चेसाठीं उत्सुक असणारीं आढळलीं. श्री. देवधर यांच्या पत्नीनें पूर्वी चार-धाम यात्रा पायीं केल्या होत्या असें कळलें. श्री. सरदार व त्यांच्या पत्नी यांची हरिकथाश्रवण, तत्त्वनिरूपण व व्रतवैकल्यें यांवर विशेष श्रद्धा होती असें आढळलें. डॉ. यशवंतराव व त्यांच्या पत्नी यांची परहिततत्परता प्रसंगविशेषी ठळकरीत्या दिसून आली. माझी पत्नी दोन दिवस अचानक आजारी पडली. तसेंच श्री. पानसरे यांना त्यांच्या हृदयव्यथेमुळें ठिकठिकाणीं त्रास झाला व आणखी पुष्कळ मंडळींना मध्यंतरीं अस्वस्थ प्रकृतीनें चिंतातूर बनविलें; पण डॉ. यशवंतरावांनीं बहुतेकांना उपचार करून वेळोवेळीं व्याधिमुक्त केलें. श्रीमती सुर्वे या कर्मठ आचाराच्या वाटल्या. पहांटे तीन वाजतां उठून त्यांनीं प्रत्यहीं स्नान उरकावें, पोथीपाठ व देवपूजा नेमानें पार पाडावी आणि मगच मार्गक्रमणासाठीं बाहेर पडावें असा त्यांचा अखेरपावेतों बाणा होता. तसेंच खाद्यपेय घेण्याचे वेळीं जवळ असणाराला त्या 'राम' नाम घ्यावयास लावून मगच अन्न-पाण्याचें सेवन करीत असत. श्री. बापूसाहेब सबनीस यांच्या उतारवयाच्या मानानें व त्यांची किरकोळ शरीरयष्टि लक्षांत घेतां त्यांचीं चालण्याची तडफ पाहून मोठें कौतुक वाटे. बदरीनारायणाच्या पुढें सहा मैलांवर असणारे वसुधारा नामक ठिकाण पाहावयासाठीं जी पांच-सात मंडळी तयार झाली त्यांत बापूसाहेब प्रामुख्यानें होते. पायीं चालणारांत श्री. सवाई वकील व श्री. बापूसाहेब या

दोघांची बरोबरी इतर कोणालाच कधीं करतां आली नाहीं. हींच दोन माणसें नेहमीं आघाडीवर असावयाचीं. श्री. बापूसाहेबांच्या उत्साहांतील अपूर्वाई थोडक्यांत अशीही सांगतां येईल कीं, स्टेशन-वर गाडी थांबत असे, मोटार ठिकठिकाणीं उभी राही अथवा आमचे मुक्काम कमीअधिक काल विविध स्थळीं होत असत, त्या सर्व ठिकाणीं पांच मिनिटांची जरी सवड मिळाली तरी जमेल तेवढ्या अंतरापुरती चाल ते न चुकतां करून येत. ते चालतांना कधीं कंटाळलेले वा शिणलेले दिसले नाहींत हें विशेष होय. श्री. पानसरे हे अघळपघळ बोलणारे, इतरांनीं हवी तेवढी थट्टा केली तरी त्यांना पुरून उरणारे व शारीरिक शक्ति पुरेशी अनुकूल नसतांहि अवघड यात्रा अट्टाहासानें करूं पाहाणारे एक सद्-गृहस्थ होते. यांच्या उपस्थितीमुळें सर्वांचेंच खूप मनोरंजन झालें एवढा त्यांचा स्वभाव सोशिक, बोलका व विनोदी होता.

देवप्रयागला सुमारें अर्धा तास थांबल्यावर आमच्या मोटारी ज्या पुढें निघाल्या त्या तेथून २१ मैलांवर असणाऱ्या **कीर्तिनगर** गांवीं जाऊन दुपारीं २ वाजतां थांबविण्यांत आल्या. निघतांना बरोबर तयार करून घेतलेल्या पुरीभाजीवर त्या ठिकाणीं आम्हीं दुपारची वेळ भागविली. चहापानानंतर थोडीशी विश्रांति घेऊन दुपारीं तीननंतर आम्ही पुढें निघालों. पंचवीस मैलांवर असणाऱ्या रुद्रप्रयागला आम्ही सायंकाळीं सहा वाजतां जाऊन पोंचलों व त्या ठिकाणीं आमचा रात्रभर मुक्काम झाला.

**रुद्रप्रयागः**--हें देवप्रयागच्या धर्तीवर उंच पहाड-पठारावर वसलेलें शहरवजा गांव आहे. मंदाकिनी व अलकनंदा या दोन नद्यांचा संगम त्या ठिकाणीं झाला आहे. या दोन नद्यांचे प्रवाह परस्परांवर एवढ्या जोरांत आदळतांना दिसतात, कीं तेथें फार वेळ उभें राहणें आपल्या कान व डोळ्यांना मुळींच सोसवत


नाहीं. संगमावर पाण्यांत उतरण्याची गोष्ट तर दूरच राहो, पण तांब्यानें पाणी घेऊन कांठावर बसून स्नान करावयाचें झाल्यास लागणारें पाणी वारंवार प्रवाहांतून वर घेणेंही फार धोक्याचें ठरतें. धुण्याचें वस्त्र पाण्यांत बुडवलें तर पाण्याच्या बलवत्तर वेगांत तें इतकें जबरदस्त ओढ घेऊं लागतें, कीं हातीं धरणाराच पटकन् खेचला जाऊन गंगार्पण व्हावयाची हटकून भीति संभवते. सारांश, नांवाप्रमाणें तें संगमस्नान अक्षरश: 'रौद्र' भासतें यांत शंका नाहीं. हरिद्वारपासून सर्व नद्यांचें पाणी सर्वत्र बर्फासारखें गारगार असल्यानें श्रद्धा म्हणूनच स्नान उरकणें भाग पडतें. पाणी प्यावयाची वा पाण्यांत प्रत्यक्ष उतरण्याची इच्छा कधींहि कोणाला होत नाहीं.

रुद्रप्रयाग येथील संगमावर जाण्याकरितां शे-दीडशे पायऱ्या उतरून खालीं जावें लागतें. दरम्यान वाटेवरच गंगेचें चिरेबंदी व छोटया आकाराचें सुरेख मंदिर आहे. वर चढून आल्यावर रुद्रेश्वर महादेवाचें दर्शन घडतें. त्या गांवीं संस्कृत महाविद्यालय असल्याचें समजलें. नदीच्या तीरीं पण उंच स्थळीं असणाऱ्या बाबा काली-कमळीवाले यांच्या भल्या मोठ्या धर्मशाळेंत ती रात्र आम्ही काढली. त्या धर्मशाळेंत उतरलेल्या असंख्य व विविध ज्ञाति-पेशांतील स्त्री-पुरुषांचा तीन दगडांवरील झटपट रंगारी थाटाचा स्वयंपाक आम्ही दुरून कितीतरी वेळ पहात होतों. देवदर्शनापायीं स्वेच्छेनें पत्करलेलें त्यांचें वनवासी जीवन पाहून आम्हांला करमणुकीबरोबरच उद्बोधनही झालें. कंपनीच्या सुसज्ज सोयी-मुळें आमच्या जेवण्या-राहण्यांतील सौख्य व त्या असंख्य यात्रि-कांच्या जेवण्या-राहण्यांतील अनेक परीच्या अडीअडचणी यांची तुलनाच करतां येण्याजोगी नव्हती, आणि तरीहि तीं सर्व माणसें आनंदी व नामसंकीर्तनांत दंग होतांना आढळलीं.

रुद्रप्रयागहून शुक्रवार दि. ८ मे रोजीं पहांटे पांच वाजतां

मोटारींनीं आम्ही पुढें निघालों. सुमारें [illegible] मैलांवर चंद्रपुरी गांवाच्या पुढें **काकडा** नामक ठिकाण होतें. तेथें सकाळीं आठ वाजण्याचें सुमारास पोंचतांच आमचा मोटारीचा प्रवास त्या ठिकाणीं पूर्ण झाला. आणि तेथून आमच्या पायचालीस सुरुवात. झाली. मी, बाळासाहेब, श्री. गोरे, श्री. देवधर, श्री. सरदार ही पांचजण सपत्निक व सौ. कुसुमताई, श्रीमती इंदिराबाई, श्री. सवाई वकील आणि श्री. सबनीस वकील मिळून सुमारें सोळा माणसें पायीं चालूं लागलों. बाकीच्यांनीं पुढीलपैकीं इष्ट तीं वाहनें येथूनच अवलंबिलीं.

| | वाहनाचें नांव | १०० मैलांस आकार | तपशील |
|---|---|---|---|
| १. | दंडी | रु. ३५०–० | चार कुलींच्या सहाय्यानें वाहण्यांत येणारें वाहान. |
| २. | कंडी | १२५–० | एकाच कुलीच्या सहाय्यानें वाहण्यांत येणारें वाहान. |
| ३. | घोडा | १२५–० | घोडयाचा धनी हातीं लगाम धरून बरोबर चालत असतो. |



दंडी

श्री. नानासाहेब वैद्य व त्यांच्या पत्नि, श्री. सवनीसांची पत्नि व सासू, श्री. पानसरे, श्री. राजाभाऊ भिडे, प्रा. भट व त्यांची पत्नि या सर्वांनीं दंड्या केल्या होत्या. गं. भा. आजीबाई, डॉ. यशवंतराव यांच्या पत्नी व श्रीमती भिडे काकू यांनीं कंडींतून प्रवास करावयाचें ठरवलें आणि दादासाहेब, त्यांची मेहुणी, डॉ. यशवंतराव व सौ. पावसकर यांनीं घोड्यांच्या साधनाचा अवलंब केला. येणेंप्रमाणें सैन्यांतील विविध दलांच्या संचलनानुरूप आमचे विविध प्रकारचे गट त्या स्थलापासून पडले जाऊन आमचा तदनंतरचा प्रवास पुढें सुरूं झाला.



कंडी



घोडा

**गुप्तकाशी:**—काकडा घाटापासून तीन मैलांवर असणाऱ्या डोंगरमाथ्यावर गुप्तकाशी हें ठिकाण आहे. तो रस्ता एवढ्या खड्या चढीचा होता कीं त्या ठिकाणीं पोंचावयास आम्हांला तीन तास

लागले आणि पहिल्या सलामींतच पायीं चालतांना आम्हां सर्वांची जी त्रेधा उडाली त्यामुळें पुढील प्रवासाची आम्हांला दहशतच बसली.

गुप्तकाशी हें गांव समुद्रसपाटीपासून ५००० फूट उंचीवर वसलें आहे या स्थळाच्या समोरच्या डोंगरपठारावर उखीमठ असून परततांना त्या ठिकाणीं जाण्याचें आम्हीं ठरवलें होतें. मंदाकिनी नदी त्या ठिकाणापासून अति दूर-अंतरावरून व अगदीं खोल असणाऱ्या दरींतून वाहाते. या ठिकाणीं असणारें सृष्टिसौंदर्य अर्थातच अति रमणीय दिसतें. फार दूर अंतरावर हिमालयाची जी उंचच उंच ओळ दिसते तीवरील हिमाच्छादित असणारा थोडाफार भाग गुप्तकाशीहून प्रथमत: दृष्टीस पडूं लागतो. त्या स्थळाला '**गुप्तकाशी**' हें नांव पडण्याचें कारण समजलें तें असें— त्या ठिकाणीं काशीविश्वेश्वराचें मंदिर आहे. तथापि काशी-विश्वेश्वराचा वास तेथें गुप्तपणें (?) असतो. त्या मंदिरासमोर 'मनकर्णिका' नामक तीर्थकुंड असून त्या कुंडांत गंगा व यमुना नामक दोन जलधारा अखंड पडत असतात. त्या कुंडांत स्नानें करून 'गुप्तदानें' (?) देण्याचा रिवाज आहे. मनकर्णिका कुंडानजीक अर्धनारीनटेश्वराचें देवालय आहे. संस्कृत पाठशाला व वैद्यक-विद्यालयहि मंदिराच्या आवारांत आहे. जवळच्या डाक बंगल्यांतच आमचा मुक्काम असल्यानें त्या दिवशीं रात्रीं मंदिरांतील आरतीच्या सोहळ्यास आम्हीं तेथें उपस्थित राहिलों.

हिमालय विभागांतील पायीं प्रवास प्रत्यहीं पहाटें चार वाजतां सुरू करावा लागतो आणि सकाळीं नऊ-साडे नवाच्या सुमारास आठ ते दहा मैल चाल आटोपून त्या ठिकाणच्या चट्टीवर थांबावें लागतें. आश्चर्य असें कीं, पहाटें चार वाजतांच दऱ्याखोऱ्यांतील तेथील अरुंद असणारा अवघड रस्ता स्पष्ट दिसावा इतकें स्वच्छ

दिसूं लागतें. तसेंच कमालीचा थंड प्रदेश असतांही नवानंतरचें ऊन असह्य भासूं लागतें. चट्टी म्हणजे ज्या ठिकाणीं साध्या चहापासून पन्नास पाऊणशें मंडळींची जेवण्या-रहाण्याची सोय होऊं शकेल एवढ्याचपुरतें विश्रांतिस्थान. सामान्यत: दर दोन मैलावर लहान लहान चट्ट्या असतात. गुप्त काशीसारखी थोड्या विस्तृत वस्तीचीं स्थळें साधारणपणें आठ ते दहा मैलांवर असतात. आमचा परिवार मोठा व आमच्या बरोबरचा व्यापही मोठा. आम्ही पन्नास माणसें व दोन खोल्या भरून वर उरणारें आमचें अमर्याद सामान. त्यामुळें लहान चट्टीवर रात्रीं मुक्काम करणें आम्हाला मुळींच शक्य नव्हतें. इतकेंच नव्हें तर दुपारपुरती उतरण्याची व स्नाना-भोजनाची आमची सोयही अपुऱ्या जागीं होण्याजोगी नव्हती. त्याकरितां आमचें प्रवासाचें वेळापत्रक दादासाहेबांनीं इतके बिनचूक आंखलें होतें कीं, पहाटें तीन वाजतां पहिली शिट्टी वाजवून सर्वांना त्यांनीं जागें करावें. एका तासांत शौच-मुखमार्जन आटोपून सर्वांनीं चहा घ्यावा. होल्ड-ऑल, बॅग आदि सामान मेणकापडांत गुंडाळून ठराविक गड्याचे स्वाधीन करावें, आणि चार वाजतां पोषाख अंगावर चढवून, हातीं काठ्या धरून दुसरी शिट्टी वाजतांच सर्वांनीं आगेकूच करावें.

गुप्तकाशीहून शनिवारीं पहाटें चार वाजतां आम्ही निघालों. बारा मैलांवर असणाऱ्या फाटा चट्टीवर आम्हांला पोंचावयास नऊ वाजले. तेथील धर्मशाळेंत चहा व स्नान झालें. कंपनीच्या **'लाईनदोरी'** योजनेनुरुप सर्व स्वयंपाक तयार झाल्यावर आम्हा सर्वांचें सुरेख भोजन झालें. घटका दोन घटका विश्रांति घेतली. माशांचा उपद्रव त्या चट्टीवर फार भासल्यानें दुपारीं ३ वाजल्यानंतर फाटा चट्टीचा निरोप घेऊन तेथून तीन मैलांवर असणाऱ्या **रामपूर** नामक गावीं सायंकाळीं पांच वाजतां जाऊन पोंचलों आणि त्या ठिकाणीं आम्ही रात्र काढली.

'**लाईन दोरी**' प्रकरण दरम्यान मी समजावून घेतलें. दादासाहेबांच्या नियोजनाचा तो एक उत्कृष्ट नमुनाच होता. आचारी, वाढपी व गडी यांचे पायीं प्रवास-विभागापुरते कंपनीनें दोन स्वतंत्र गट केले होते. सर्व मंडळीचा मुक्काम पुढें ज्या ठिकाणीं व्हावयाचा असेल त्या चट्टीवर वा गांवीं आवश्यक सामग्रीसह एक गट आधींच रवाना होत असे. त्या गटनायकानें सोयीची जागा पाहून ती ताब्यांत घेणें, त्या जागेच्या प्रवेशद्वारावर कंपनीच्या नांवाचा फलक लावणें, सरपण, पाणी मिळवून स्वयंपाकास लागणें आणि सर्व मंडळी मागील मुक्काम सोडून त्या ठिकाणीं येतांच त्यांना ताबडतोब चहा, नंतर स्नानासाठीं गरम पाणी व लगेच भोजनाला बसवून बाकीचीं पुढील सूत्रें दुसऱ्या गटाच्या स्वाधीन करून लगेच त्या पहिल्या गटानें पुढच्या मुक्कामीं रवाना होणें, ही सारी जी अत्यंत मार्मिक योजना होती तिला '**लाईन दोरी**' म्हणण्याची कंपनीकृत संज्ञा होती. या 'लाईन दोरी'मुळें आठ दहा दिवसांतील शंभर मैलांच्या पायीं प्रवासांत आमची लाईनी (तसू) एवढीही गैरसोय कधीं कोठें झाली नाहीं. एरवी अतिशय थंड हवेंत उघड्यावरील आमच्या साऱ्या हालचालींनीं व खाण्यापिण्यांतील अडचणींनीं आम्हां सर्वांनाच हैराण केलें असतें यांत शंका नाहीं.

आमच्यांत श्री. नानासाहेब वैद्य वकील होते. बदरीनाथ संस्थानची पुण्याच्या आसपास कांहीं स्थावर प्रॉपर्टी होती, तिचे व्यवहार पहाणारे ते एक ट्रस्टी होते असें समजलें. यात्रेला निघण्यापूर्वी श्री. नानासाहेबांनीं बदरीनाथ संस्थानच्या मुख्य पंचमंडळींशीं पत्रव्यवहार केला होता. त्यामुळें त्यांचा प्रवास सुखकर व्हावा व त्यांच्या निवासाची सोयही इतमानानें व्हावी एतदर्थ तेथील पंच मंडळीमार्फत खास सोय कांहीं ठिकाणीं करण्यांत आली होती. गुप्तकाशीपासून पुढें ठिकठिकाणीं संस्थानचा चपराशी त्यांच्या

दिमतीस असे. उतरण्याची सोय डाक बंगला अगर तत्सम चांगल्या इमारतींत होत असे.

यात्रेला निघण्यापूर्वी श्री. नानासाहेबांच्या पाठीवर छोटीशी शस्त्रक्रिया झालेली होती. जखम ताजी असतांही बँडेज बांधून मोठ्या साहसी उत्साहानेंच ते निघाले होते. प्रत्यही डॉक्टर व दवाखाना यांना ठिकठिकाणीं भेट देऊन बँडेज बांधण्याचें काम न चुकतां व कोणालाही न समजतां ते करून येत असत. महिनाभरांत त्यांना स्नान तर करतांच आलें नाहीं, पण पाठीवर निजणें, टेकून बसणें यासारख्या साध्या क्रियाही त्यांना करतां आल्या नाहींत. आणि तरीही त्यांची प्रसन्न वृत्ति ढळला नाहीं म्हणूनच हें ध्यानांत ठेवण्याजोगें वाटलें. पायीं चालण्याएवढा उत्साह व मनाची तयारी असतानांही पाठीवरील ओल्या जखमेमुळें नानासाहेबांना दंडी नामक वाहान करावेंच लागलें. असो.

रामपूरचा मुक्काम आटोपून रविवार दि. १० मे रोजीं वहिवाटीनुसार प्रातःकाळीं चार वाजतां आम्हीं पुढें निघालों. दहा मैलांवर असणाऱ्या गौरीकुंड येथें आम्हीं नऊ वाजतां पोचलों. रामपूर ते गौरीकुंड यांच्या दरम्यानची वाट चढउताराची असून मध्यंतरी वासुकी व मंदाकिनी या दोन नद्यांचा संगम झालेला आढळला. मंदाकिनीवर त्या ठिकाणीं असणारा ‘ लक्ष्मण–झूला ’ धर्तीवरील लोखंडी पूल ओलांडून आम्हांला पुढें जावें लागलें. तदनंतर शिरविरहित एक गणपतीची मूर्ति दिसली. ‘मुंडकटा’ गणपती असे त्या देवाचें नांव होतें. त्याला अभिवादन करून आम्हीं पुढें चालूं लागलों. गौरीकुंड हें ठिकाण समुद्रसपाटीपासून नऊ हजार फूट उंचीवर आहे. एवढ्या चढाईवर जाणारी वाट काटण्यास आम्हांला पांच तास चालायला लागावेत हे अगदीं स्वाभाविक होतें.

रामपूर ते गौरीकुंड व गौरीकुंड ते थेट केदारनाथपुरी या दरम्यानच्या पायीं प्रवासांत दृष्टीस पडणारें सृष्टिसौंदर्य चढत्या क्रमानेंच वृद्धिंगत होत गेलें. सबंध रस्त्यावर खडा चढ होता. खालीं खोल दरींतून अत्यंत वेगानें वाहात असणाऱ्या मंदाकिनीच्या प्रवाहाच्या खळखळाटाची साद सतत कानीं पडत होती. रस्त्यानें कधीं तिचा ओघ अगदीं जवळून, कधीं कांहीं अंतरावरून जाई तर क्वचित् प्रसंगीं तिच्या वाळवंटाच्या कडेकडेनेंही आमची अरुंद असणारी पाऊलवाट जात होती. केदारनाथाचें दर्शन घेऊन परतणारीं माणसें रस्त्यांत समोरून येतांना भेटत. त्यांच्या मुखावाटें "जय बदरी केदारनाथ" अशी ललकारी न चुकतां बाहेर पडायची. मागून व पुढून येणारीं मेंढ्या–घोडीं–खेंचरें–दंड्या–कंड्या आदि वाहनें त्या अरुंद वाटेवर सन्निध येतांच एकदम–'बचो' 'बचो' 'पहाडके तरफसे चलो' आदि दिले जाणारे इषारे कानीं पडत. लगेच आम्ही डोंगराचे आश्रयानें आपापलें अंग चोरून उभें रहावें, आणि येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांचा मार्ग मोकळा करून द्यावा. पहाडी मुलुखांतील वन्य जमातींचे तेथील नागरिक व त्यांची छोटीं–मोठीं मुली–मुलें अति देखणी व गुटगुटीत दिसत. त्यांच्या मुखावर असणारी गौर गुलाबी कांति त्यांच्या उत्कृष्ट आरोग्याची साक्ष देई. तीं मुलें वा स्त्रिया येणाऱ्या जाणाऱ्या यात्रिकांजवळ पै–पैशाची, सुई–धाग्याची व कुंकवाऐवजीं कपाळावर लावण्यांत येणाऱ्या बिंदीची विनम्रपणें याचना करीत. पहाडावरील उंच उंच झाडावर लांकडें व पानें तोडण्याकरितां चढलेल्या तरूण मुली क्वचित् आढळत. तसेंच लांकडाच्या मोळ्या वा झाडाच्या ओल्या फांद्यांचा भला मोठा बोजा आपल्या पाठीवर घेऊन चढउतारावरील अवघड वाटांवरून अगदीं सहजगतीनें जात असलेल्या पहाडी ललना भेटत. कष्टी जीवनांतील त्यांची प्रसन्नवृत्ति पाहून सखेदाश्चर्य वाटे. एवंच

गौरीकुंडला पोंचतांना पायीं प्रवासांतील आमच्या भोंवतालचें वातावरण अगदीं अभिनव व अपूर्व असेंच होतें.

**गौरीकुंड** :—हें गांव मंदाकिनीच्या तीरीं आहे. नदीच्या पात्रापासून सुमारें ऐंशी फुटावर अलीकडील बाजूस चौरस आकाराचें चिरेबंदी बांधून काढलेलें एक कुंड असून त्या कुंडांत वरील बाजूस असणाऱ्या गोमुखांतून गरम पाण्याची धार अखंड पडत असते. पलीकडील मंदाकिनीच्या पाण्याचा स्पर्श हिमसदृश गार असल्यानें त्यांत बोट घालवत नाहीं, उलटपक्षीं या कुंडांतील धार अत्यंत कढत असल्यानें त्या जलधारेंत हात धरणेंही सर्वस्वीं अशक्य ठरतें. नऊ हजार फूट उंचीवर संपूर्णपणें कडक थंड असणाऱ्या हिममय प्रदेशांत व विशेषतः अगदीं जवळून मंदाकिनीच्या पाण्याचा असह्य शीतल ओघ वाहात असतांना त्या ठिकाणीं तप्त जलधारा अखंडित पडणारें कुंड असावें ही एक नैसर्गिक चमत्कृति होय यांत शंका नाहीं. भोंवतालचें वातावरण त्या ठिकाणीं इतकें थंड होतें कीं, चहाच्या पाण्याला तेथें उकळी फुटेना आणि तापविलेलें पाणी दहा-पांच मिनिटेंही गरम राहीना. देवी पार्वतीनें त्या कुंडावर स्नान केलें होतें असें कळलें. गौरीकुंड हें नांव त्यामुळेंच त्या गांवास प्राप्त झालें असावें. कुंडाजवळ पार्वतीचें मंदिर, एक शिवलिंग आणि अमृतकुंड नामक गार पाण्याचें दुसरेंहि एक कुंड त्याठिकाणीं आहे. पुणें सोडल्यापासून आठवड्यानंतर स्नानासाठीं भरपूर गरम पाणी व तेंही अतिशय थंड प्रदेशांत मोठें सुखकारक वाटत असतांना गार पाण्याच्या वाटेस जातो कोण ? आम्ही सर्वांनीं गौरीकुंडांत यथेच्छ जलविहार केला. बरोबर असणाऱ्या सर्व स्त्रियांनीं डोक्यावरून पाणी घेऊनच सचैल स्नानें तेथें उरकलीं. गौरीकुंडावरील निसर्गशोभेंत निरतिशय भर पडण्याचें कारण म्हणजे तेथून अवघ्या सात मैलांवर असणाऱ्या केदारनाथ पर्वताचा बराचसा हिमांकित भाग

स्पष्टपणें दिसूं लागला. दुपारच्या उन्हामुळें त्या उत्तुंग पर्वताचें दिसणारें कांतिमय स्वरूप पाहून मी अगदीं विस्मयचकित झालों. पार्श्वभागीं मंदाकिनीच्या वेगवत्तर प्रवाहाचा खळखळाट, सभोंवतीं हिरवीगार रम्य वनश्री आणि समोर हिमनगाचें उज्वलतेनें तळपणारें गगनंभेदी मनोहर दृष्य पाहून माझें देहभान क्षणैक हरपलें. कितीतरी वेळ मंत्रमुग्धावस्थेंत असल्याप्रमाणें चारी दिशांना चौफेर न्याहाळून पुनः पुनः तेथील दिव्य सृष्टिशोभा मी पहातच होतों व तरीही माझी तृप्ति होईना.

अक्षयतृतीयेच्या सुमुहूर्तावर गौरीकुंड येथें आम्ही आल्हाददायक स्नानविधि उरकला. नंतर सुग्रास भोजनें झालीं. भोजनोत्तर दुपारीं तीन नंतरचा चहा घेतला व चार मैलांवर केदारनाथाच्या पायथ्याशीं असणाऱ्या **रामबाडा** नामक चट्टीची वाटचाल आम्ही सुरू केली. सर्व रस्ता खडया चढीचा होता. विशेषतः सकाळीं आम्ही दहा मैलांचा चढ चढून गौरीकुंडापर्यंतचा टप्पा गांठला होता. तो शिणवटा कमी होण्यापूर्वीच दुपारीं चार मैलांची ही खडी चढण चढतांना आम्ही अगदीं रंजीस आलों. वाटेंतील निसर्गसौंदर्य जरी कितीही रमणीय असलें अथवा केदारनाथाच्या पर्वतावरील झळकणारी बर्फाच्छादित प्रदेशाची शोभा पावलागणिक सन्निध येऊन जरी अधिकाधिक अप्रतिम दिसूं लागली, तरी पुढें पाऊल टाकण्याचें आमच्यांतील त्राणच नाहींसें झालें होतें. त्यामुळें रामबाडयाची वस्ती गाठेपर्यंत अक्षरशः कण्हत-कुंथत आणि धांपा टाकीतच आमचा प्रवास आम्ही कसाबसा पार पाडला.

आमच्यांतील श्री. पानसरे यांना दम्याची व हृदयव्यथेची पीडा होत असे. नऊहजार फूट उंचीवरील प्रवासाला प्रारंभ होतांच त्यांचे हृदय कासावीस होऊं लागलें. त्यांची बोबडी वळली.

प्रवासाला आल्याचा त्यांना व आमच्यांत त्यांना घेतल्याबद्दल आम्हां सर्वांना पश्चाताप वाटूं लागला. आम्ही आपापली प्रवास-पीडीत अवस्था विसरून त्यांच्या शुश्रुषेची तजवीज करूं लागलों. त्यांना धीर देण्याकरितां कां होईना पण आमचा धीर आम्हांला सांभाळावा लागला. रामबाडा हें ठिकाण बर्फमय प्रदेशांनीं चोहों बाजूंनीं परिवेष्टित असल्यानें त्या ठिकाणीं घालविलेली ती एक रात्र आम्ही रजया-रुजाम्यांत लपेटून घेऊन मोठ्या उबेंत कशीबशी घालवली एकदांची.

सोमवार दि. ११ मे ची सुप्रभात आमच्या जीवनांत सहस्र-रश्मीर्च्या सुवर्णकिरणांच्या प्रकाशानें अक्षरशः उजाडणार होती. त्या सुमंगल प्रातःकाळीं सहस्त्रावधि मानवांना परम दुर्मिळ असणाऱ्या केदारनाथाचें अपूर्व दर्शन आम्हांला घडणार होतें. रामबाडा चट्टीवर पहांटे चार वाजतां गरम गरम चहाचे दोन कप घशाखालीं रिचवले आणि ऊबदार पोशाख चढवून व हातीं बर्फावरून चालतांना धरावयाची टोंकदार काठी घेऊन आम्ही मोठ्या उत्साहानें चट्टीबाहेर पडलों. आमची 'लाईन दोरी' अर्थात् काल सायंकाळींच केदारनाथला रवाना झाली होती. आमचें सामान आमच्या मागोमाग खेंचरावरून केदारनाथला वेळेवर पोंचविण्याची दक्षता दादासाहेबांनीं चोख ठेवली होती. रामबाडा ते केदारनाथ मंदिर या दरम्यानचें अंतर फक्त तीन मैलांचें होतें खरें, पण सुमारें तीन हजार फुटांचा चढ तीन मैलांत चढून वर जावयाचें असल्यानें सदर तीन मैलांचें अंतर चालून जाणें अतिशय त्रासदायक होतें. दुःखांत सौख्य एवढेंच, कीं रोज कमींत कमी दहा व जास्तींत जास्त चौदा मैल चढउताराची पायीं वाटचाल आम्हाला करावी लागली होती. आणि आज मात्र फक्त तीनच मैलांचें अंतर व तेंही प्रातःकालच्या उल्हास-दायक समयीं चालावयाचें आम्ही बाकी ठेवलेलें होतें. विशेषतः

केदारनाथ दर्शनाच्या उत्कंठेनें चढ चढतांना पाय जरी कुरकुरूं लागले तरी मनाची धांव पुढें होऊं लागली; घशाला जरी कोरड पडली तरी श्रध्देचा ओलावा मुखांतील जागा व्यापून नसानसांतून वाहूं लागला; कंबर जरी लुळी पडली तरी आत्मप्रेरणेच्या बळा-वर सारीं गात्रें आपापलीं कार्यें अखेरपावेतों बिनचूक करूं लागलीं. तीनच मैलांचा प्रवास. पण पावलागणिक केदारनाथ पर्वताच्या सौंदर्यांत पडूं लागलेली अपरंपार भर पाहून चित्त अगदीं वेडावून गेलें. केदारनाथ मंदिराचें ओझरतें दर्शन मैलभर अंत-रावरून ज्यास्थळीं अचानक प्रथमतः होतें त्या स्थळाचें नांव '**देवदेखणी**' असें औचित्यपूर्ण आहे. 'देवदेखणी' गांठल्यावर केदारनाथ मंदिर व त्या मंदिराचा दिव्य परिसर पाहून आपण स्वप्नांत तर नाहीं ना असेंच मला वाटलें. मर्त्य भूमीवर एवढें अलौकिक व परमोच्च प्रतीचें सौंदर्य असेल हें तेंच दृश्य प्रत्यक्ष समोर दिसत असतांनाही माझ्या मनाला पटेना. "**रूप पाहतां लोचनी, सुख झालें हो साजणी**" ही काव्यपंक्ति मुखाबाहेर आपोआप पडून केवळ '**बहुत सुकृताची जोडी**' म्हणूनच घडून आलेल्या त्या दिव्य दर्शनानें माझी सर्व काया अगदीं पुलकित होउन गेली. माझें मनच नव्हें तर माझ्यांतील अणूरेणूही विनम्र बनून त्या निसर्गसाक्षात्कारापुढें लीन झाला. पुढील मैलभर अंतर व त्या टापूंत वाटेंत ओलांडलेले हिममय प्रवाह यांची मला दखल नव्हती. पायांत नव चैतन्य संचारलें. त्या उमेदींत जेव्हां केदारनाथवरील निवासस्थानीं जाऊन मी पोंचलों, तेव्हांच पूर्ववत् भानावर आल्याची जाणीव मला प्राप्त झाली.

केदारनाथ व देवदेखणी यांच्या दरम्यान वाटेच्या कडेला एक दीन यात्रेकरू मरून पडलेला दृष्टीस पडला. त्याची वळकटी एकीकडे पडली होती व कडाक्याच्या असह्य थंडींतच त्याचें त्याठिकाणीं वेड्यावांकड्या अवस्थेंत कोसळलेलें कलेवर पूर्णपणें

काळवंडलेलें व लाकडासारख्या ताठ स्थितींत असलेलें दिसलें. विचारा प्रातःकालच्या पूर्वीं कधींतरी गतप्राण झाला असावा. विशेषतः वाटेनें जाणारा-येणारांना त्याच्या निश्चेष्ट व मृत देहाकडे पाहून दीर्घसुस्कारा टाकण्यापलीकडे कांहींएक करतां येण्याजोगें नव्हतें. देवदर्शन तरी त्याला झालें होतें किंवा नाहीं हेंही कळावयास मार्ग नव्हता. केदारनाथपुरीस गेल्यावर तेथील चौकीदाराजवळ आम्ही त्या दुर्दैवी घटनेची खबर देऊन टाकल्या-वर मग बरें वाटलें.

नेपाळ नरेशांच्या प्रासादतुल्य बंगल्यांत उतरण्याची **पंडित महेश** या बदरीनाथच्या पंड्यांनीं आमची सोय केली होती. बंगल्यांतील सुसज्ज दिवाणखान्यांत मीं डोकावलें. दिवाणखान्यांत कलाकुसर असणारे रंगीबेरंगी गालिचे सर्वत्र अंथरलेले दिसले. त्यावर रुईच्या मऊ मऊ व आकर्षक वेलबुट्टीच्या रजया ठेवलेल्या आढळल्या. दोन मोठ्या आकाराच्या लोखंडी शेगड्यांतून शेंक-ण्यासाठीं व दिवाणखान्यांतील उष्णता कायम राहावी म्हणून फुलते निखारे जळत असलेले दृष्टीस पडले. हातपाय व तोंड ऊन पाण्यानें धुऊन एका रसरसलेल्या शेगडीजवळ जाऊन मी बसलों मात्र, तोंच पं. महेश यांनीं स्वतः भरून आणलेला चहाचा कप माझ्या हातीं दिला. उत्तम दुधाच्या आणि दालचिनी-सुंठ आदि मसालायुक्त असणाऱ्या चहाची चव घेतांच माझा सारा शीण समूळ नाहींसा होऊन ऐश्वर्यसंपन्न असणाऱ्या तेथील चैतन्ययुक्त वस्तुजातानें पुनश्च मी भारावून गेलों. तदनंतर मी थोडी विश्रांति घेतली. गरम पाण्यानें स्नान उरकलें. आसमंतांतील शोभा व निसर्गसौंदर्याचें अद्वितीय रूप एक सारखें न्याहाळीतच मी सर्व क्रिया करीत होतों. सकाळीं दहाचे सुमारास केदारनाथाच्या मंदिराकडे आम्ही सर्व निघालों. सुदैव असें कीं सहसा दुर्मिळ असणारी उत्कृष्ट हवा अनेक दिवसांनंतर फक्त त्याच दिवशीं

हिमालयांतील पायवाटेवर



वाहानें:–(१) घोडा (२) कंडी (३) दंडी.



उष्णोदक तीर्थ : गौरीकुंड.

सेतूविसर्जन विधि : देवप्रयाग



सौ. सुशीलाबाई व श्री. बाळासाहेब बहुधनी
आणि सौ. इंदिराबाई वैद्य

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अ. क्र. ३६१५५ वि. भू-प्रवास
क्रमांक १८२ नों. दि. ५/२/५०



"रौद्र" संगमस्थान : रुद्रप्रयाग

त्यास्थळीं नांदत होती असें तेथील कित्येक रहिवाशाच्या तोंडून ऐकलें. स्वच्छ ऊन पडलें होतें. विलक्षण थंड हवेंतील सूर्यकिरणें समशीतोष्णच नव्हेत तर परमसुखदायक भासत होतीं. केदारनाथ मंदिराला अर्धवर्तुळाकृति आकारानें वेष्टित असणारा मंदिराभोंवतालच्या पर्वताचा विस्तृत व उंचच उंच हिममय प्रदेश त्या सूर्यकिरणांच्या स्पर्शानें नजर न ठरेल अशा अलौकिक तेजांत तळपत होता. माझ्या मनांत आलें कीं केदारनाथाला युगानुयुगें आपल्या अतुलनीय सौंदर्यांच्या प्रभावानें स्थानबध्द करून टाकणारें हें रमणीय स्थान माझ्यासारख्या मानवी पामराला पहातांक्षणीं जागच्या जागीं खिळवून टाकील यांत आश्चर्य तें कोणतें ?

देवदर्शन व विश्रांति घेऊन बहुधा चारदोन तासांतच तेथून परतण्याचा सर्व यात्रिकांचा सामान्यपणें परिपाठ असे. असह्य गारठा व अनिश्चित प्रकारचें हवामान तेथें सदैव कायम असल्यानें रात्रभर वस्तीला राहाण्याचें साहस सहसा कोणी करीत नसे. पण आमचें निवासस्थान आणि कंपनीतर्फे आमच्या होणाऱ्या सर्व तऱ्हेच्या सुखसोयी यांच्या बळावर आम्ही मात्र एक रात्र तेथें राहावयाचें ठरवलें. त्यामुळें केदारनाथ मंदिर व त्या भोंवतालचें अपूर्व सृष्टिसौंदर्य आम्हा सर्वांना भरपूर पाहतां आलें. एवढेंच नव्हें तर सूर्यास्त समयाचा, उत्तर रात्रीनंतरचा व प्रातःकालचा विविध रूपांत त्याठिकाणीं विराजमान होणारा नवनवोदित देखावाहि आम्ही अवलोकिला. आमचें त्यायोगें पूर्ण समाधान झालें.

केदारनाथाच्या दर्शनाची सोमवारीं सकाळची वेळ अपेक्षेनुरूप आम्ही साधली. मंदिराचें मूळ बांधकाम पांडवकालीन असून त्याचा जीर्णोध्दार व त्यावर सुवर्णकलशांचें लेणें पुण्यश्लोक

अहिल्याबाई होळकर यांनीं चढविल्याचें समजलें. मंदिराचें आजचें स्वरूप मनोहर आहे. त्याची बांधणी चिरेबंदी व विस्तार बेताचा वाटला. आंतील गाभाऱ्यांत प्रदक्षिणा जेमतेम करतां येईल एवढीच मोकळी जागा आढळली. विशेषत: गाभाऱ्यांत केदारनाथाची मूर्ति वा किमानपक्षीं शिवलिंग दृष्टीस न पडतां पुरुषभर उंचीची आणि नंदीच्या मुख-पुच्छ रहित फक्त पाठीपुरत्याच आकाराबरहुकुम काळ्या पाषाणाची स्वयंभू असलेली निर्गुण-निराकार प्रतिमा पाहून मला कमालीचें आश्चर्य वाटलें. तोंड, नाक, कान, डोळे वा कोणताही अवयव नसणारी ती अवजड व ओबडधोबड वस्तू पाहून तिला केदारनाथ मानण्याऐवजीं आपणास आवडणाऱ्या इतर कोणत्याही दैवताचें नांव त्या प्रतीकाला कां देतां येऊं नये हा विचार तत्क्षणीं माझ्या मनांत उद्भवला. एवढेंच नव्हें तर माझ्या कुलस्वामीनीचें चिंतन मन:पूर्वक करून "**इथें कां रे उभा तूं रामा**" असें विठ्ठलाच्या मूर्तीस उद्देशून म्हणणाऱ्या **श्रीसमर्थ रामदासस्वामी** महाराजांचें स्मरण होऊन त्या प्रतीकाला माझी कुलस्वमीनी समजून मी साष्टांग नमन केलें. त्या प्रतीकाला तुपाचें मर्दन करण्याची व पंचखाद्यांचा नैवेद्य समर्पण करण्याची जी प्रथा होती ती मी पार पाडली. पूजा-आरती व तदनुषंगिक सर्व सोपस्कार यथासांग उरकल्यावर मी मंदिराबाहेर आलों. समोर मला मोठा दगडी नंदी असलेला दिसला. त्याच्या अस्तित्वामुळेंच केवळ सदरहू मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकीं होय असें मानलें जात असलें पाहिजे असें मला वाटलें. असो.

नंतर मला कळलें कीं शंकरानें महेषाचें रूप घेऊन दर्शन द्यावयाचें कामीं टाळाटाळ केलेली पहातांच भीमाला क्रोध आला. संतापाचे भरांत त्यानें महेषाच्या मस्तकावर गदेचा प्रहार करतांच त्याचें शीर धडावेगळें होऊन तें नेपाळमध्यें आज आपण

ज्याला '**पशुपतेश्वर**' मानतों त्यास्थळीं जाऊन पडलें आणि फक्त धड तेवढेंच केदारनाथ येथें राहिलें. पुढें शंकर प्रसन्न झाल्यावर त्यांच्या महेषावताराचें प्रतिक म्हणून असणारीं '**केदारनाथ**' व '**पशुपति**' नामक दोन भिन्न भिन्न पण स्वयंभूस्थानें निर्माण झालीं. अर्थात्च आज त्याठिकाणीं अनुक्रमें महेषाच्या धडाचें व शिराचें दर्शन व्हावें हें सहाजिकच होय.

केदारनाथ मंदिरांतील देवाला पूजा, नैवेद्य, वस्त्रालकार वा जे कांहीं द्रव्य अर्पण करावयाचें असेल तें पंड्यामार्फतच करावें लागतें. त्याठिकाणीं रु. ११।- पासून तों रु. १०१।- पर्यंत अनुक्रमें रुद्र, लघुरुद्र, अतिरुद्र, महारुद्र आदि पूजा बांधण्याची वहिवाट आहे. पण या विविध प्रकारच्या पूजा आपल्या समक्ष होत नाहींत हें मात्र याठिकाणीं नमूद करणें अवश्य आहे. हे सर्व प्रकारचे रुद्राभिषेक श्रावण महिन्यांत आपल्या पश्चात् तेथील पंड्यांकरवीं होत असतात. आपण फक्त तदर्थ संकल्प सोडून ठरलेलीं रक्कम तत्क्षणीं वा श्रावण महिन्याच्या अगोदर पंड्याचे हातीं पोंचेल अशा बेतानें द्यावयाची असते. आमच्यांतील कांहीं मंडळींनीं अशा विविध पूजांचे संकल्प त्याठिकाणीं केलेही.

केदारनाथ मंदिराची जागा समुद्रसपाटीपासून ११,७५० फूट उंच आहे. मंदिराच्या सभामंडपांत पांच पांडव, द्रौपदी व श्रीकृष्ण यांच्या प्रतिमा आहेत. प्रवेशद्वारीं असणाऱ्या श्री गणेशाची प्रथमतः पूजा करून आंत जावें लागतें. मंदिराच्या परिसरांत, हंस, रेत, उदक, अमृत नामक उदककुंडें आहेत. त्या कुंडांतील हिमसदृश गार जलामुळें स्नान करणें तर सर्वस्वी अशक्यच तथापि आचमनासाठीं आपला हात त्यांतील पाण्यांत बुचकळणेंही क्लेशदायक ठरतें. बोटें गारठून अगदीं वांकडीं बनतात व कळाच येतात. केदारनाथपुरी हें हिमालयांतील मनुष्यवस्तीचें अखेरचें ठिकाण

होय. वर्षांकाठीं सहा महिने मंदिरासकट केदारनाथपुरीचा सर्व भाग बर्फाखालीं अच्छादिला जातो. त्या सहा महिन्यांच्या कालांत सतत तेवत राहील असा तूप-वातीयुक्त दिवाच तेवढा मंदिरांत अखंड जळत असतो. सहा महिने त्याठिकाणीं मोजकीं माणसें व यात्रेकरू वावरतात. तपःसामर्थ्याच्या बळावर जे अत्यल्प महात्मे वर्षानुवर्षें त्याठिकाणीं अज्ञातवासांत कालक्रमणा करीत असतात त्यांपैकीं **फलाहारीबाबा** नामक साधूंचें दर्शन सुदैवानेंच मला घडू शकलें. त्या सत्पुरुषांची कोठी सहा महिने बर्फाखालीं पूर्णपणें प्रतिवर्षीं गाडली जात असतांही त्यांनीं आपलें कुटीर सतत दहा वर्षें सोडलें नसल्याचें मला कळलें. त्यांची फारच थोड्याजणांना माहिती होतीसे दिसलें. जनसंपर्कापासून दूर राहणाऱ्या त्या महाभागाच्या कुटीराकडे माहितगाराखेरीज दुसरे कोण जाणार? फलाहारीबाबा मौनव्रतधारी होते. त्यांच्या काळचा वर्णाला थंडी-वाऱ्यामुळें व अक्षय धुनीसान्निध्यानें गडद काळेपणा प्राप्त झालेला दिसला. पण त्यांच्या मुखावरील प्रसन्नता व तेज अपूर्व वाटलें. त्यांच्या सहवासांत कांहीं क्षण घालविले. त्यांनीं दिलेला प्रसाद स्वीकारला; त्यांच्या चरणावर मस्तक नमवून तेथून मी परतलों.

केदारनाथ मंदिराच्या मागें सुमारें फर्लांगभर अंतरावर **आद्य जगद्गुरु श्रीशंकराचार्य** यांची समाधि होती. त्या समाधीचें मीं दर्शन घेतलें. समाधि अद्याप उघड्यावर व दुर्लक्षित अवस्थेंतच असल्याचें पाहून वाईट वाटलें.

सोमवारीं दुपारीं फराळाची व्यवस्था होती व तो बेत तेथील पंडे **श्रीमहेशशास्त्री** यांनींच घडवून आणला होता. स्वतःच्या प्रेमळ व अगत्यकारक स्वभावानें त्यांनीं सर्वांनाच संतुष्ट केलें होतें. त्यामुळें आम्हांकडून निघतांना त्यांची संभावनाही अपेक्षेपलीकडे चांगली घडून आली.

मंगळवार दि. १२ मे रोजीं सकाळीं आम्ही केदारनाथपुरी सोडली व दुपारीं बाराचे सुमारास गौरीकुंडावर परतलों. येतांना सर्व रस्ता अर्थातच खूप उताराचा होता. तीन ठिकाणीं हिममय मार्गावरून काठीच्या आधारानें आम्हांला चालावें लागलें. उतरतेवेळीं पायावर सबंध शरीराचा भार सांभाळतांना पाय अगदीं भरून आले. शेवटचा मैलभर रस्ता तर मी मोठ्या मुष्किलीनें काटला. जातांना भयंकर चढ होता. उतरतांना फारच सोपें जाईल अशी झालेली त्यावेळची माझी समजूत प्रत्यक्ष अनुभवानें पार खोटी ठरली. मात्र केदारनाथ पर्वतावरील नयनमनोहर शोभा उतरतांनाही मी पोटभर पाहून घेतली.

गौरींकुंडावर पोंचतांच पुन: तप्तकुंडांत स्नान उरकलें. आमचा मुक्काम त्या दिवशीं तेथेंच होता. दोन्ही वेळां जेवणाचा बेत अप्रतिम होता. दमलेली आम्ही सर्व मंडळी गप्पा–विनोद व विश्रांति यांच्या अवलंबनानें मोठ्या मजेंत काळ कंठीत होतों. बुधवार दि. १३ मे ला गौरीकुंड सोडून दुपारीं बाराचे सुमारास आम्ही रामपूर गांठलें. आमच्यांतील कांहीं मंडळींनीं ८००० फूट उंचावर असणारें **त्रिजुगीनारायण** हें स्थान घोड्यावरून जाऊन दरम्यानचें काळांत पाहून घेतलें. त्या मंदिरांतील श्रीनारायणाची मूर्ति प्रेक्षणीय आहे. ब्रह्मा-रुद्रकुंड, विष्णु, महेश-सरस्वतीकुंड नामक तीन कुंडें त्या ठिकाणीं आहेत. पुराणकालांत शंकरपार्वतीचा विवाह त्यास्थळीं घडून आला व त्यांच्या विवाहाच्या वेळीं झालेल्या लाजा-होमहवनाचा अग्नि अद्याप पावेतों त्या मंदिरांत प्रज्वलीत ठेवण्यांत आला आहे. तीन युगें अखंडित असणाऱ्या कुंडांतील पवित्र अग्नीमुळेंच त्या स्थळाला त्रिजुगीनारायण हें नांव प्राप्त झालें असावें !

गुरुवार दि. १४ मे ला दुपारीं **नारायणकोटी** या ठिकाणीं तीनचार तास थांबून स्नान–भोजन व विश्रांति आम्ही घेतली.

तेथील धर्मशाळा अगदीं जुनाट होती. नानासाहेब वैद्य यांच्या मस्तकावर वरील कौलारांतून एक विंचू अकस्मात् पडला. दंश करण्यापूर्वीच त्याची वाट लावण्यांत आली म्हणून बरें झालें. तथापि तो अनुभव लक्षांत घेऊन दुपारीं तीनचे सुमारास तें गांव आम्ही सोडलें व पांच मैलांवर आणि ६००० फूट उंचीवर असणाऱ्या उखीमठांत सायंकाळीं आम्ही मुक्कामास गेलों. उखीमठ हें ठिकाण फारच रमणीय आहे. **उखीमठ** व **गुप्तकाशी** हीं दोन भिन्न डोंगरमाथ्यावरील गांवें परस्परासमोर आहेत. त्यांच्या दरम्यान असणाऱ्या अति खोल दरींतून मंदाकिनी वाहते. मंदाकिनी नदीवरील लोखंडी झुलता पूल, त्या नदीच्या खोऱ्यांत एकीकडून उतरतांना व दुसरीकडे चढतांना दिसणारें निसर्गसौंदर्य आणि नदीच्या तीरावर असणारी संस्कृत महाविद्यालयाची इमारत व इतर छोटीं छोटीं घरें आणि मंदिरें मोठीं मनोहर भासतात. उखीमठाची धर्मशाळेची इमारत अगदीं नवीन बांधलेली दिसली. पाणी व शौचकूप यांची सोयही तेथें होती. उखीमठाच्या भव्य मंदिरांत ओंकारेश्वराचे दगडी लिंग आहे. पौराणिक कालीं उषा व अनिरुद्ध यांचा विवाह त्यास्थळीं झाला. म्हणूनच त्या ठिकाणाला उषा मठ (उखी मठ) असें नांव प्राप्त झालें आहे.

प्रतिवर्षी सहा महिने केदारनाथाचें मंदिर जेव्हां बर्फाखालीं असतें तेव्हां त्या कालांत केदारनाथाच्या सुंदर प्रतिमेची पूजा-अर्चा या मठांत केली जाते, देवाचे भोग तेथें चढविण्यांत येतात, आणि भाविकांना केदारनाथाचें दर्शन ह्याच ठिकाणीं घडविलें जातें.

कंपनीतर्फे दर गुरुवारीं रात्रीं श्रीदत्तप्रभूच्या फोटोसमोर आरतीचा सोहळा पार पाडण्याचा कार्यक्रम न चुकतां होत असे. पहिला गुरुवार आम्ही रुद्रप्रयाग येथें साजरा केला होता. आजची

आरती उखीमठांतील धर्मशाळेंत आम्ही मोठ्या इतमामानें पार पाडली.

शुक्रवारीं पहाटें पावसाची एक सर अचानक कोसळली. पण दादासाहेब तिला कुठचे दाद देणार! त्यांनीं ठरल्याक्षणीं शिट्टी वाजवलीच. मनांत नसतांही आम्हां सर्वांना पहाटें चार वाजण्यापूर्वीं उठावेंच लागलें आणि एका तासांत नेहमींच्या क्रिया यंत्रवत् उरकून पांच वाजतां तेथून निघावेंही लागलें. काकडाघाट नामक तीन मैलांवरील ठिकाणीं, उतारावरील रस्ता आक्रमून उजाडल्यानंतर आम्ही पोंहचलों. त्या ठिकाणांहून पुढें मोटारीचा प्रवास सुरू झाला. रुद्रप्रयागला जावयास आम्हांला दुपारीं १२ चा सुमार झाला होता.

रुद्रप्रयागला त्या रात्रीं आम्ही मुक्काम केला. असंख्य यात्रेकऱ्यांनीं परिवेष्टित असणाऱ्या तेथील प्रमुख धर्मशाळेंत सायंकाळच्या वेळीं सभोंवतीं पेटविण्यांत आलेल्या तीन दगडावरील अगणित चुली व त्यावर होणारा झटपट रंगारी स्वरूपांतील स्वयंपाक यांचें आणखी एकदां आम्ही अवलोकन केलें. दादासाहेबांच्या कृपेनें आम्हांला मिळालेल्या मिष्टान्न भोजनावर आम्ही यथेच्छ ताव मारला. केदारनाथाची यात्रा निर्विघ्नपणें पार पडल्याचें समाधान एकीकडे आम्हांला वाटत असतांना दुसऱ्यादिवशीं पहाटे उठून बदरीनाथपुरीकडे निघायची तयारी आम्ही करूं लागलों. त्या रात्रीं आम्ही मोठ्या खुशींतच होतों. शनिवार दि. १६ मे ला पलीकडील मोटारस्टँडवर आम्ही गेलों. सकाळीं सात वाजतां दोन मोटारींतून सामानासह आम्ही बसून रुद्रप्रयागहून प्रयाण केलें व दुपारीं १२ वाजतां **पीपलकोटी** या गांवीं जाऊन आमच्या मोटारी थांबल्या. बरोबर घेतलेल्या फलाहाराच्या वस्तूवर जेवणाची वेळ भागवून विश्रांति घेतल्यावर दुपारीं तीन

वाजतां पीपलकोटीहून निघून सायंकाळीं पांच वाजतां बेलाकुची नामक चट्टीवर आम्ही उतरलों.

**बेलाकुची**:-हें ठिकाण अलकनंदेच्या तीरावर आहे. त्या ठिकाणीं नदीच्या प्रवाहाचा जोर एवढा विलक्षण आहे कीं तो पहातांना आपली दृष्टि व प्रवाहाचा खळबळाट ऐकून आपलें कान वधीर बनतात. त्या अगदींच लहान असणाऱ्या चट्टीला नसतें महत्त्व अशासाठीं प्राप्त झालें होतें कीं तेथील अलकनंदेच्या तुफान प्रवाहावर मोटारी पलीकडे जाण्यासाठीं अवश्य असणाऱ्या लोखंडी पुलाचें काम अद्याप पूर्ण होत होतें. बेलाकुचीच्या पैलतीरापासून पुढें पंधरा मैलांवर असणाऱ्या जोशीमठापर्यंतचा मोटारीचा रस्ता तयार होऊन पांच-चार दिवसांपूर्वी तो सुरूही करण्यांत आला होता खरा; पण अलीकडील तीरावर शे-पन्नास मोटारींतून प्रत्यही पांच-सातशें यात्रेकरू येऊन उतरत असत. नदीवर असणाऱ्या अगदीं जुनाट, मोडकळीस आलेल्या, असुरक्षित व भयाण पुलावरून सर्वांना पलीकडचें तीर पायीं गांठावें लागे. पलीकडच्या बाजूस फक्त पांचच मोटारी बेलाकुची ते जोशीमठ यांच्या दरम्यान जात-येत होत्या. त्यामुळें सर्व यात्रेकरूंना त्या पांच मोटारींतून एकाच वेळीं पुढें नेतां येणें अशक्य असल्यानें, बाकीच्यांना मोटारींत सोय होईपर्यंत त्याठिकाणीं थांबावेंच लागे. तेथील मोडकळीस आलेली एकुलती एक धर्मशाळा आणि लहानमोठीं सर्व उपाहारगृहें प्रवाशांच्या गर्दीनें अगदीं भरून गेलीं होतीं. सोईच्या अभावी त्यांतील कित्येकांना दोन-दोन दिवस त्या असुरक्षित चट्टीवर काल कंटणें क्रमप्राप्त झालें होतें. त्याच बेलाकुचीला आणि अलकनंदेवर असणाऱ्या झुलत्या पुलावर पुढील रोमांचकारक घडलेली घटना, उघड्या डोळ्यांनीं आम्हांला पहावी लागली.

त्या तकलुपी पुलावरील वाट अगदीं अरुंद होती. पायाखालीं

असणाऱ्या वाटेवरील लाकडीफळ्या कमीजास्त रुंदीच्या होत्या. इतकेंच नव्हें तर दोनतीन ठिकाणीं चटकन् आंत पाय जावा अशी भोकेंही त्या फळ्यांमधून पडलेलीं दिसत होतीं. पुलावरून जाणाराला दोहों बाजूस आधारदाखल कोणतीही सोय नव्हती हें प्रामुख्यानें लक्षांत घ्यावें. अशा अरिष्ट-संपन्न असणाऱ्या पुलावरील वहातूक एकाच वेळीं दोहोंकडून न व्हावी म्हणून तेथें एक कायमचा रखवालदार ठेवण्यांत आला होता खरा! पण तो क्षणभर आपली जागा सोडून अन्यत्र गेल्याचें निमित्त झालें. पलीकडून अलीकडच्या दिशेनें जीं माणसें यावयास निघालीं त्यांत नणंद-भावजयीचें नातें असणाऱ्या अंदाजे पन्नास वर्षें वयाच्या दोन पंजाबी महिला आघाडीवर होत्या. तोंच पाठीवर खूप मोठा बोजा असणारें एक खेचर अलीकडून पलीकडे जावयास अचानक निघालें. पाठीवरील ओझ्यामुळें खेचरानें वाटेची सर्व रुंदी अजिबात व्यापून टाकली होती. तशांत डुलत डुलत अगदीं अंगास चाटून जाऊं पहाणाऱ्या त्या खेंचराला चुकविण्याचा त्या दोन स्त्रियांनीं यत्नही स्वाभाविकपणेंच केला असावा. पण खेचरावरील बोजाचा तडाखा त्यांतील एका दुर्दैवी महिलेस लागून अकस्मात् तिचा देह पुलाखालील अलकनंदेच्या अवखळ प्रवाहांत पडला; आणि आश्चर्य असें कीं कांहीं सेकंदांतच त्या अभागी जीवाचें नदीच्या बेफाम प्रवाहांत असें कांहींतरी झालें आसावें कीं पुढें चोवीस तासांत, नदीच्या पात्रांतून अनेक मैल खूप संशोधन केलें असतांही तिचा ठावाठिकाणा मुळींच लागला नाहीं. तिच्या देहाचीच नव्हें तर तिच्या अंगावरील वस्त्राची यत्किंचित् खूण देखील पोलिसांना वा इतर कोणाला मुळींच सांपडली नाहीं.

बेलाकुचीला घडलेल्या उपरोक्त अपघाताची आठवण झाली कीं अद्याप माझ्या अंगावर कांटा उभा राहतो. त्याच पुलावरून आमची यात्रा सुफल-संपूर्ण पार पडली ती केवळ नारायणाचीच

कृपा होय, या जाणीवेनें माझें हृदय अगदीं भरून येतें. "**जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती । वागविशी हातीं धरोनिया**" हेंच शेवटीं खरें असल्याचें प्रत्ययास येतें. '**त्याचा आधार**' सुटला कीं अलकनंदेच्या प्रवाहांत गचांडी मिळावयास काय उशीर आहे ?

रविवार दि. १७ मे ला दुपारीं ३ वाजतां जोशीमठाकडे जाणाऱ्या मोटारींत आम्हांला जागा मिळाली. आमच्या बरोबरचें अमर्याद सामान मोटारींत घेण्याची खळखळ याच ठिकाणीं फार झाली. त्यानिमित्तानें मोटारवाला व आमचे दादासाहेब यांच्या दरम्यान तासभर वाटाघाटी सुरू होत्या. अखेरं चतुर दादांनीं त्याची 'समजून' काढण्यांत यश मिळवलें व आमचा प्रवास पुढें सुरू झाला. एरवी बेलाकुचीला आणखी एक रात्र कंठण्याचा पंचप्रसंग आमच्यावर ओढवला असता व आमची अवस्था मोठी करुणाजनक झाली असती.

**जोशीमठ** या गांवाचें मूळ नांव **ज्योतिर्मठ** असें आहे. त्या ठिकाणीं **आद्य श्रीशंकरा-चार्यांनीं** स्थापिलेला मठ आहे. हें स्थान गंधमादन पर्वतावर असून तेथून कैलासपर्वताचें दर्शन घडूं शकतें. श्रीनृसिंह, वासुदेव,गरुडभगवान, नवदुर्गा, शाकंबरी आदि देवदेवतांचीं मंदिरें तेथें आहेत. गंगा-यमुना नामक दोन थंड पाण्याच्या जलधारा तेथेंही एका मंदिराच्या परिसरांत अखंड वाहात आहेत. अतिशय थंडी असल्यानें स्नान करण्याऐवजीं मार्जन करूनच आम्ही आमचें कार्य पार पाडलें. जोशीमठ हें स्थान समुद्रसपाटीपासून ६००० फूट उंचोवर असून श्रीबदरीनाथाच्या वाटेवरील मोटारीचा प्रवास या ठिकाणीं पूर्ण होतो. पुढचा सोळा मैलांचा प्रवास येथून आज तरी पायींच करावा लागतो आहे.

रुद्रप्रयाग ते जोशीमठ यांचे दरम्यानच्या मोटारीच्या रस्त्यावर

पुढील सुविख्यांत स्थळें लागलीं. तथापि त्या त्या ठिकाणीं आम्ही पंधरा ते वीस मिनिटांपेक्षां अधिक न थांबल्याकारणानें त्या स्थळीं असणाऱ्या देवतांचीं दर्शनें वा अधिक माहिती आम्हांला मिळाली नाहीं.

**कर्णप्रयाग** :—अलकनंदा व पिंडरगंगा या नद्यांचा संगम या गांवीं झाला आहे. संगमानजीक वृक्षांच्या गर्द छायेंत एक मंदिर आहे. त्या मंदिरांत कर्ण, श्रीकृष्ण, दुर्गादेवी यांच्या प्रतिमा आहेत. द्वापारयुगांत महारथी कर्ण यानें त्याठिकाणीं सूर्याची उपासना केली होती व महायज्ञ करून अजिक्यपद मिळवून देणाऱ्या कवचकुंडलांचा लाभ त्याच ठिकाणीं त्याला झाला होता, म्हणून त्या स्थळाला कर्णप्रयाग असें नांव प्राप्त झालें. या ठिकाणाची उंची २६०० फूट असून येथें पोस्ट, तार-ऑफिस, हॉस्पिटल व डाक-बंगला या सोयी आहेत.

**नंदप्रयाग** :—येथें अलकनंदा व नंदगंगा या दोन नद्यांचा संगम झालेला आहे. रावणानें श्रीशंकराची आराधना ज्या ठिकाणीं केली ते **दशमोसी** नामक गांव तेथून थोडयाच अंतरावर आहे. या स्थानाची उंची ३००० फूट असून येथेंही पोस्ट, तार-ऑफिस, डाकबंगला या सोयी आहेत. वाटेवरील उपरोक्त दोन सुप्रसिद्ध स्थळांकडे फक्त दृष्टिक्षेप टाकून आणि बेलाकुचीला पाहिलेल्या अपघाताच्या आठवणीमुळें आपापला जीव अधिक भानगडींत न घालतां आम्ही थेट **जोशीमठ** गांठले.

जोशीमठला असणारे शौचकूप वस्तीपासून अति दूर व अशा उतरंडीवर होतें कीं उतरणाराचा देह, त्याचा पाय चुकून जर घसरला तर शेंदीडशें फूट खालीं गडगडत गेलाच म्हणून समजावें. विशेषत: पहांटे चार वाजतां अंधारांतून संडासाकडे जात असलेल्या त्या धोकेबाज रस्त्यावरून उतरणें आम्हांला क्रमप्राप्त होतें.

त्यामुळें जातांना व येतेवेळींही जोशीमठाला आमच्या मुक्कामांत शौचविधि निर्विघ्नपणें उरकून सुरक्षित परतणें ही बाब आम्हां सर्वांनाच भयंकर दिव्यवत् वाटली.

हिमालयांतील या यात्रा पार पाडणाऱ्या यात्रिकांसाठीं मोठ्या वस्तीच्या ठिकाणीं मजबूत बांधलेले शौचकूप आढळले. लहान चट्या वा तुरळक वस्ती असणाऱ्या बहुतेक सर्व स्थळीं, एवढेंच नव्हे तर, रुद्रप्रयाग, जोशीमठ, बदरीनाथपुरी वा बदरीकेदार येथेंही तट्टयाच्या सहाय्यानें बांधलेल्या तात्पुरत्या स्वरूपांतील मुताऱ्या व शौचकूप आहेत. '**झनाना**' व '**मर्दाना**' अशीं अक्षरें कावेनें लिहून, त्यांत स्त्रीपुरुषांची भिन्नभिन्न खोपटांतून सोय केलेली असते. शौचकूपांना दाराऐवजीं गोणपाटाचा लोंबता पडदा लटकत असतो. या शौचकूपांभोंवतीं पांढऱ्या रंगानें मढविलेल्या दगडांचीं कुंपणदर्शक रेषा असते. शौचकूपांकडे जाणाऱ्या रस्त्यावर कामट्यांची हिरवा रंग दिलेली एक उंच कमान व त्या कमानी-वर तसेंच आंतील शौचकूपांवर तांबड्या रंगाच्या फडक्याचीं निशाणें फडकत असतात. शौचकूपाखातर केलेल्या या सर्व संकेत-सोयीमुळेंच इतरत्र असणारी जागा यात्रेकरूंनीं अमंगल विधीनें अपवित्र केलेली कोठेंही आम्हांला दिसली नाहीं. उत्तर प्रदेश सरकारनें घेतलेल्या एतद्विषयक दक्षतेचें ठिकठिकाणीं आम्ही सर्वांनीं भरपूर कौतुकही केलें.

जोशीमठाहून सोमवार दि. १८ मे ला प्रात:काळीं चार वाजतां आम्ही निघालों. तीन मैलांचा उतार उतरून खालीं पायथ्याशीं असणाऱ्या **विष्णुप्रयाग** नामक गांवीं सूर्योदयाचे सुमारास आम्ही पोंचलों. विष्णुगंगा व अलकनंदा या दोन नद्यांचा संगम त्या ठिकाणीं खोल दरीविभागांत झालेला आढळला. विष्णुगंगेवरील झुलता लोखंडी पूल आम्ही ओलांडला. संगमाचें दृश्य रुद्रप्रयाग-इतकेंच रौद्र भासलें. संगमावर विष्णुमंदिर होतें. भयंकर गारठा

व पाण्याची हिमसदृश शीतलता लक्षांत घेतां स्नानाऐवजीं मार्जनविधि उरकून आम्ही पुढचा रस्ता धरला.

विष्णुप्रयाग ते पांडुकेश्वर हें पांच मैलांचें त्यापुढील अंतर काटावयास आम्हांला तीन तास लागले. सर्व रस्ता दोहों बाजूस उंचच उंच उभ्या असलेल्या अगदीं भकास डोंगरदरींतून खड्या चढीचा होता. अरुंद वाटेवर ठिकठिकाणीं असंख्य मेंढरांचे कळप लागत होते; समोरून येणारे यात्रेकरू, घोडीं, खेचरें, दंड्या व कंड्या वारंवार भेटत असत. रस्त्याच्या डाव्या बाजूस उंच पहाडाची अखंड उभी असणारी भिंत असे व उजव्या बाजूस खोल दरी आणि तीमधून वाहणारें अलकनंदेचें अवखळ पात्र दिसे.

बदरीकेदारच्या वाटेवरील रम्य वनश्रीशीं तुलना करतां बदरीनारायणाच्या वाटेनें दिसणारें निसर्गाचें दृश्य रोमांचकारक, सौंदर्यहीन व नेत्रास परावृत्त करणारें भासलें. रस्ता पहावा तर अरुंद व दोन डोंगरांच्या खिंडीमधून गेलेला. दोहों बाजूंचे उंच उंच पहाड बघावेत तों त्यांवरून ना वृक्ष वा ना तृणांकूर. गगनभेदी डोंगरांतील चिंचोळ्या रस्त्यावर घाण्याभोंवतीं डोळ्यावर ढापणें चढविलेल्या बैलांप्रमाणें जाणाऱ्या प्रवाशांना इतर कोणतेंहि सुखदायक दृश्य बघावयास मिळणेंच अशक्य. नजीक वाहाणाऱ्या अलकनंदेच्या प्रवाहाच्या चित्तविदारक आवाजाची व तिच्या तांडवनृत्य करीत जाणाऱ्या जलौघाची अखंड सोबत. त्यामुळें हृदयाचा थरकांप न होईल तरच नवल. एवंच तो पांच मैल रस्ता कंटाळवाण्या व भेदरलेल्या स्थितींत चालून दहाचे सुमारास आम्ही कसेंबसें पांडुकेश्वर गांठलें एकदांचें !

**पांडुकेश्वरः**—तेथें जातांच आमच्या 'लाईनदोरीनें' प्रथमतः चहा व त्यामागोमाग आमच्या स्नानाची व्यवस्था केली. बाबा कालीकमळीवाले यांच्या जुनाट धर्मशाळेंतील प्रशस्त दालनांत आम्ही आमचे

बिछाने अंथरले. स्नानोत्तर तेथें असणाऱ्या ध्यानबदरीचें,विष्णुचें व पांडवशीलेचें आम्ही दर्शन घेतलें. पंडुराजाचें दहन त्यास्थळीं झालें होतें व माद्री ही त्याची स्त्री त्याठिकाणीं सती गेली होती असें ऐकलें. भोजन झाल्यावर पावसाला जोरांत प्रारंभ झाला. मूळच्या अति थंड हवेंत त्यामुळें कमालीचा गारठा निर्माण झाला. अर्ध्या वाटेंत असणारे यात्रेकरू ओलेचिंब होऊन काकडत व कुडकुडत त्या-ठिकाणीं धांवतच येतांना दिसले. एवंच केदारनाथाइतकी बदरी-नारायणाची यात्रा सुखकर नसल्याची प्रतीति पुन: एकदां आली. बदरीनाथ विभागांत दुपारीं बाराच्यापुढें हवा व पाऊस यांच्या अनिश्चितपणामुळें प्रवास करणें नेहमींच धोक्याचें असतें असें ऐकलें. पुढील प्रवासाचा बेत अर्थात्‌च आम्ही दुसऱ्या दिवसावर ढकलला.

मंगळवार दि. ११ मे हा दिवस एकदशी असलेला उजाडणार होता. आदल्या दिवशीं रात्रीं पांडुकेश्वरीं भोजनाचेवेळीं, एका-दशीस बदरीनारायणाचें दर्शन घेऊनच एकादशी साजरी कराव-याचा बेत सर्वानुमतें ठरविण्यांत आला होता. त्याला अनुसरून मंगळवारीं पहाटे चार वाजतां आम्ही जे चालूं लागलों ते पांच मैलांवर असणाऱ्या **हनुमानचट्टीवर** सूर्योदयाचे सुमारास जाऊन दाखल झालों. तेथें चहा घेतला आणि तीन मैलांचा अखेरचा खडा चढ चढून १०,५०० फूट उंचीवर असणाऱ्या बदरीनाथपुरी-कडे मोठ्या उत्साहानें आम्ही आगे कूच केलें.

पांडुकेश्वर ते बदरीनाथपुरी यांच्या दरम्यानचें अंतर आठ मैलांचें होतें. पण सर्व रस्ता खड्या चढाचा होता. वाटेंत मागें नमुद केलेल्या सर्व प्रकारच्या अडचणी तर होत्याच. पण आणखी दोन नवीन संकटांची त्यांत भर पडली होती. पहिलें संकट म्हणजे वरून मोठमोठे दगड घसरून खालीं वाटेनें जात असतांना

नेमके आपल्या डोक्यांत केव्हां पडतील याचा नेम नव्हता. कारण तशा अर्थाचा इषारा देणारे फलकच त्या त्या ठिकठिकाणीं लावण्यांत आले होते. दुसरी बाब अशी होती कीं कांहीं ठिकाणचा अति उंचावरील अरुंद रस्ता इतक्या भुसभुशींत मातीचा व कच्च्या स्वरूपाचा होता, कीं तो आपल्याच भारानें ढासळणार तर नाहीं ना अशी भीति दर पावलागणिक वाटूं लागली. तसेंच ज्वालामुखीच जणूं कांहीं शांत होऊन फक्त राखेचे ढिगारे मागे राहावेत व त्या राखेच्या उंचवटयावरून पाऊलवाट काढण्यांत यावी असा मार्ग पुष्कळ वेळां आम्हाला आक्रमावा लागला. बर्फाच्छादित विभागांतील दीड वीत वाटेवर चालून पुढें जाण्याचें साहस चार ठिकाणीं आम्हांला करावें लागलें. अलकनंदेवरील झुलता लोखंडी पूलही हनुमान चट्टी सोडल्यानंतर एकदां आम्ही ओलांडला. अखेरच्या दीड मैलांतील अलकनंदेच्या प्रवाहावर तर ठिकठिकाणीं बर्फाचें संपूर्णपणें अच्छादन असल्याचें आढळलें. बर्फाच्या अजस्त्र व अखंड कवचाखालून वाहाणारा त्या नदोचा प्रवाह व्यक्त झालेला क्वचित् ठिकाणीं दृष्टीस पडे व पुन: तो अदृश्य होई.

येणेंप्रमाणें बदरीकेदारच्या वाटेवरील सौंदर्याची व बदरीनाथाच्या वाटेवरील निसर्गशोभेची तुलना करतांना त्या दोहोंत दोन ध्रुवांइतकी तफावत असलेली पदोपदीं मला दिसून आली. तो टापू जितका नयनमनोहर व सौंदर्यसंपन्न तितकाच हा भाग मला भयप्रद व सौंदर्यहीन वाटला. त्याठिकाणचें सृष्टिसौंदर्य पुनः पुनः पहात रहावेसें वाटलें तर याठिकाणीं दिसणारीं कांहीं दृश्यें पाहातांच दृष्टि मिटवून घ्यावीशी वाटली. तिकडचा चढ अत्यंत कठीण होता व त्यामानानें इकडचा चढ पुष्कळच कमी होता यांत शंका नाहीं. पण तिकडच्या निसर्गसंपदेमुळें तो चढ चढतांना शीण मुळींच वाटला नाहीं. उलटपक्षीं येथील चढण चढतांचढतां माझ्या नाकीं

नऊ आलें. दोन मैल अंतर चढून गेल्यावर मी अगदीं मेटाकुटीस आलों होतों.

तोंच या ठिकाणच्या '**देवदेखणी**' नामक स्थळीं जाऊन मी दाखल झालों. त्याठिकाणीं मी पोंचलों मात्र. मैलभर अंतरावर समोर असणाऱ्या बदरीनाथपुरीचें तेथून विहंगम दृष्टीनें अचानक मला जें दर्शन घडलें तें होतांच माझी सारी निराशा व माझें सारें औदासीन्य समूळ नष्ट होऊन उलटपक्षीं अवघे परिश्रम सार्थकी लागलेसे मला वाटलें. तिकडील देवदेखणीहून बदरीकेदार मंदिराच्या दृश्यानें जो परिणाम माझ्या मनावर त्यावेळीं केला होता त्याचीच साक्ष या देवदेखणीहून बदरीनाथपुरीचें दर्शन होतांच पुनश्च माझ्या मनाला परिपूर्ण पटली. येथें असणारें देवदेखणी ठिकाण अशा उंचवटयावर होतें, कीं अलीकडून चढत चढत वर येणारा यात्रेकरू अगदीं वरच्या टोंकास येतांच पलीकडच्या सखोल भूभागीं वसणाऱ्या त्या अलौकिक देवनगरीचें दर्शन अचानक व अत्यंत परिणामकारक रीत्या त्याला घडूं शकतें. अलकनंदेच्या दोन्हीं बाजूस विराजमान होणारी बदरीनाथपुरी, त्या नगरींतून वाहणारे त्या नदीचें नागमोडी पात्र, नदीवरील झुलते पूल, सभोंवतीं बर्फाच्छादित असणारीं गिरीशिखरें, नगराचें मध्यभागीं असणारें बदरीनाथ मंदिर, त्या मंदिरावरील सुवर्णकलश व विशेषतः सकाळच्या कोंवळ्या सूर्यकिरणांचा बर्फाच्छादित भागावर, मंदिराच्या सुवर्णकलशांवर व तेथील सर्व वस्तुजातावर पडलेला चैतन्ययुक्त प्रकाश पाहून मी अक्षरशः नाचावयास लागलों. उरलेलें मैलभर अंतर न तोडतां तेथून दिसणारें अलौकिक ऐश्वर्यच एकसारखें पहात राहावेसें मला वाटलें. बऱ्याच वेळानें व बरोबरची सर्व मंडळी पुढें निघून गेल्यावर तें स्थान मी मोठ्या कष्टानें सोडलें व हळूहळू त्या मनोरम नगरींत प्रवेश केला.

अशा रीतीनें एकादशीच्या पुण्यपर्वणीस सकाळीं साडेदहाच्या

सुमारास बदरीनाथपुरींत जाऊन पंडित धनेशशास्त्री यांच्याच बंगल्यांत आम्हीं उतरलों. दुपारीं १२ वाजतां देवाचें द्वार बंद होतें हें समजल्यामुळें आम्ही लगेच तप्तकुंडावर स्नानासाठीं गेलों. हें तप्तकुंड बदरीनाथ मंदिराच्या पायथ्याशीं व अलकनंदेच्या अलीकडच्या तीरालगत आहे. गौरीकुंडापेक्षां या कुंडाचें बांधकाम चांगल्या चिरेबंदी स्वरूपाचें केलेलें असून कुंडाचे वरील बाजूस पत्र्यांचे छप्पर आहे. कुंडांत अखंड पडणारी पाण्याची धार एवढी कढत होती कीं पाण्यांत उतरून एके ठिकाणीं फार वेळ स्थिर उभें राहातां येणें सर्वस्वी अशक्य ठरलें. पाण्याची खोली कुंड भरलें असतां खांद्यास लागेल एवढी होती. एकावेळीं पंचवीस-तीस माणसें आंत उतरून स्नानें उरकीत होतीं त्यावरून कुंडाचा विस्तारही कळण्याजोगा आहे. आरोग्याच्या दृष्टीनें याठिकाणीं वा गौरीकुंड येथील तप्त कुंडांत उतरून हवीं तीं माणसें जीं मनसोक्त जलविहार करतांना दिसलीं तसें करूं देणें निदान मला तरी अप्रशस्त वाटलें. विशेषत: आंत उतरणाऱ्या मंडळींनीं चुळा भरून तें पाणी कुंडांतच मुखाबाहेर टाकणें, त्वचा दूषित असणारांनींही जलाशयांत उतरून दूषित त्वचा आंतल्या आंत पाण्यानें धुणें हे प्रकार मला अत्यंत निषेधार्ह वाटले. पण माझ्या वाटण्याचा उपयोग होण्याजोगा होता थोडाच ! किंबहुना तें अक्षम्य प्रकार प्रत्यक्ष समोर चालू असतांही मला त्या कुंडांत उतरून ओळीनें तीन दिवस स्नान करावेंच लागलें ना ? असो.

आमच्या सुदैवाची मातब्बरी अशी कीं, तीन दिवस आम्ही बदरीनाथपुरीस राहावयाचें ठरवलें आणि आम्ही यावयाच्या आदल्या दिवसापर्यंत त्या ठिकाणों असणारी वादळी, पावसाळी व अभ्राच्छादित हवा जी एकदम निवळली ती तीन दिवसानंतर खालीं उतरून आम्ही पांडुकेश्वरीं पोंचल्यावर मगच पुन: तिला अनिश्चितपणा प्राप्त झाला. किंबहुना शुक्रवार दि. २३ मे ला दुपारीं दोन वाजतां आम्ही पांडुकेश्वरीं पोंचलों व इकडे त्याच सुमारास

पावसानें बद्रीनाथपुरीवर प्रलय केल्याचें वृत्त माझ्या कानीं आलें.

ठरल्याप्रमाणें मंगळवारीं तप्तकुंडांत स्नानें आटोपून, पूजा-साहित्य व पंचखाद्य नैवेद्याचीं तबकें हातीं घेऊन आम्ही नारायणाचे दर्शनासाठीं मंदिरांत गेलों. मंदिर उंचावर आहे. महाद्वारापर्यंत वर जातांना बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात. आंत मंदिर व सभामंडप यांच्यासभोंवतीं प्रदक्षिणेसाठीं विस्तृत मोकळी जागा आहे. पुढें गरुडाची मूर्ति, मागील बाजूस लक्ष्मीची मूर्ति, मंदिराच्या प्राकारांत गणेश, हनुमान, घंटाकर्ण व खद्द मंदिराच्या गाभाऱ्यांत पद्मासनस्थ नारायणाच्या मुख्य प्रतिमेशेजारी नर-नारायण, नारद व उद्धव यांच्या मूर्ति विराजत आहेत. नारायणाची प्रतिमा काळ्या पाषाणाची व स्वयंभू असून आद्य श्रीशंकराचार्यांनीं तिची प्रतिष्ठापना केली असल्याचें समजलें. मंदिरांत सर्वत्र विजेची रोषणाई आहे. आंतील गाभाऱ्यांत दोहों बाजूंस उंच समयांतून अनेक ज्योति अखंड तेवत असतात.

निसर्ग सौंदर्याच्या दृष्टीनें केदार व नारायण यांच्या आसंमत-विभागांत जशी बरीच तफावत आढळली तद्वत् त्या दोन्हीं देव-स्थानांच्या ऐश्वर्यांतही कमालीचा फरक दिसून आला. केदारनाथ हें बोलून चालून विरक्त असणाऱ्या शंकराचें स्थान. त्यामुळें तेथें वस्ती अत्यल्प, एकांत अधिक, भक्तांची गर्दी बेताशीर, भक्त कफ-ल्लक व त्यामुळें देवाचें प्रतीकही अलंकार विरहित. तेथें मंदिरा-बाहेरची दिव्य निसर्ग शोभा वगळ्यास इतर कोणतेही ऐश्वर्य आढळलें नाहीं. त्याच्या अगदीं उलट येथें अनुभव आला. कारण याठिकाणचें मंदिर कुणाचें तर लक्ष्मीपति जो नारायण त्याचें. सहाजिकच मंदिरावरील सुवर्णकलशापासून तों गळ्यांत चमक-णाऱ्या नवरत्नहारापर्यंत एकापेक्षां एकेक मूल्यवान् वस्तू येथें दृग्गोचर व्हाव्यांत यांत काय नवल ! नारायणाच्या अंगावरील

पोशाख व अलंकार याठिकाणीं भारी किंमतीचेच असणार, किंबहुना नारायणाची ती स्वयंभू असलेली प्रतिमा परिसाची आहे अशीही वदंता एकाचे तोंडून मी ऐकली. लोखंडाचा स्पर्श परिसाला झाला कीं लोखंडाचें सोनें होतें अशी समजूत आहे. या न्यायानें नारायणाच्या त्या मूर्तीचा ( परिसाचा ) स्पर्श जर मानवाला ( लोखंड ) झाला तर नराचा नारायण ( सोनें ) होईल या धास्तीनेंच कदाचित् आम्हां मानवांना नारायणाच्या मूर्तीला स्पर्श करूं न देण्याची खबरदारी तेथें घेतली जात असावी असेंही मला वाटलें. केदारनाथ मंदिरांतील गाभाऱ्यांत जाऊन मूर्तीला तुपाचें मर्दन करून मस्तक टेंकवण्याइतकें भाग्य आम्हां सर्वांनाच तेथें लाभलें होतें. उलटपक्षीं येथील नारायणाच्या मंदिरांत गाभाऱ्यांबाहेर पांच सात फुटांवर असणाऱ्या कठड्यासन्निध उभें राहून भरजरी वस्त्रांनीं व मूल्यवान् अलंकारांनीं सर्वांग पूर्णपणें अच्छादलेल्या नारायणाच्या फक्त मुखाचें व तेंही अस्पष्टपणें होणारें दर्शन घेऊन आम्हाला स्वस्थ बसावें लागलें. एवढी खर्चाची व कठीण यात्रा जीव धोक्यांत घालून मीं पत्करली. मोठ्या परिश्रमानें मी श्रीचरणाजवळ येऊन ठाकलों. आणि तरीही त्या पतित पावन चरणकमलांचा साधा स्पर्श देखील मला घडूं नये याची खंत त्यामुळें मनाला फार फार वाटली. हिरमुसला होऊन सांजसकाळ त्याठिकाणीं जाऊन नारायणापुढें मी उभा राहात असे. व व्यथित हृदयानेंच मूर्तीचें दर्शन घेऊन कष्टी मनानें मंदिराबाहेर मी पडत असे. त्या आठवणीनें माझी श्रद्धा आजहि मला बैचेन करीत आहे. असो.

मंदिराच्या उजव्या बाजूस असणाऱ्या एका दालनांत नारायणाला रोकड रकमेपासून तो सुवर्ण-अलंकारापर्यंत ज्याला जें अर्पण करावयाचें असेल तें स्वीकारून रीतसर पावती देण्याची खास सोय देवस्थान कमिटीमार्फत केलेली होती. चौकशी केल्या-

वर कळलें,कीं यात्रेच्या मोसमांत नारायणाचें रोजचें उत्पन्न किमान पांचहजारापासून दहा हजारापर्यंत असतें. या उत्पन्नावरून त्या ठिकाणीं वस्ती बरीच असावी, यात्रा बहुसंख्य जमावी आणि यात्रेकरूही खूप सधन येत असावेत असेंच सिद्ध होत नाहीं काय?

दुसऱ्या दिवशीं म्हणजे बुधवारीं सकाळीं द्वादशी होती. ऋषि, गंगा, कूर्मधारा, प्रल्हादधारा व नारद या पांच तीर्थकुंडांवर जाऊन आम्हीं मार्जनस्नानें उरकलीं आणि तप्तकुंड ऊर्फ ब्रह्मतीर्थावर जाऊन अखेर आंघोळी उरकल्या. तदनंतर ब्रह्मकपाली ज्यांना आपापल्या वाडवडिलांना अक्षय मुक्ति मिळावी असें वाटत होतें त्यांनीं श्राद्धविधि उरकून त्याठिकाणीं पिंडदान केलें. त्यानंतर पारण्यानिमित्त पक्वान्नयुक्त सुग्रास भोजन झालें. विश्रांति घेतल्यावर सायंकाळीं चार वाजतां चहा घेऊन आम्ही बदरीनाथपुरी पहावयास बाहेर पडलों.

प्रत्यक्ष बदरीनाथपुरीची रचना व शोभा अवर्णनीय आहे यांत शंका नाहीं. आम्हांला त्याठिकाणीं दोन हजारापर्यंत कायमवस्ती व तेवढीच नित्य नवीन येणारी यात्रिकांची संख्या त्या तीन दिवसांत आढळली. मुख्य मंदिराच्या वाटेवर तेथील बाजारपेठ आहे. दुकानांतून खाद्य-पेयें, लोकरीचीं व सुती वस्त्रप्रावरणें, किराणा माल, हिमालयीन तीर्थस्थानें व देवदेवता यांचे टांक, वेगवेगळ्या आकाराचें फोटो–चित्रें, आणि विशेषत: शिलाजीत, कस्तुरी व औषधि-वनस्पति यांचें वैपुल्य असलेलें आढळलें. बदरीनारायण या शब्दांतील यथार्थता तेथील पंड्याकडून कळली ती अशी :— बदरी म्हणजे बोरीचें झाड, बदरीनारायण वाटेवर असणाऱ्या जंगलांत बोरीचीं झाडें अनेक आहेत. पौराणिक कालीं उन्मत्त झालेल्या सहस्रकवच नामक एका वरसंपन्न दैत्याचें पारिपत्य करावयासाठीं खुद्द भगवान् विष्णूंनीं नर–नारायणाचा अवतार धारण करून तपश्चर्या करावयाचें

ठरवलें. भगवान् नारायणांनीं त्याकरितां सर्वत्र हिंडून अखेर ही जागा पसंत केली व तेथें तपानुष्ठान आरंभिलें. लक्ष्मीला ही वार्ता समजतांच थंडीवाऱ्यापासून नारायणाचें संरक्षण व्हावें यासाठीं तिनें बोरीच्या झाडाचें रूप घेतलें व आपली छाया नारायणाचें मस्तकीं तप:कालापावेतों कायम धरली. लक्ष्मीनारायणाच्या त्यावेळच्या संयुक्त कार्यामुळें त्या स्थळाला बदरी (बोरी-लक्ष्मी) नारायण असें नांव पुढें प्राप्त झालें.

बदरी नारायणाच्या मंदिरांत साध्या तुलशीदलापासून तो महापूजा बांधण्यापर्यंत रीतसर पैसे भरून व पावती घेऊन व्यवस्था होऊं शकते. तसेंच भोग चढवावयाचे बाबतींतही पंचखाद्य नैवेद्यापासून पंचपक्वान्नाचा महानैवेद्य समर्पिण्याची आणि रेशमी वस्त्रापासून तो सुवर्णालंकारापर्यंत वस्त्रालंकारही देवाला अर्पण करण्याची त्याठिकाणीं वहिवाट आहे. विष्णुसहस्र नाम म्हणावयास त्याठिकाणीं बरीच पंडे–मंडळी आहेत. ठराविक रक्कम दिल्यास देवाच्या प्रवेशद्वारानजीक जातां येतें. पूजा नैवेद्य व विष्णु सहस्रनामाचा पाठ हा '**देवाचिये द्वारीं**' पोटभर ऐकतां येतो.

बदरीनाथपुरीस तीन दिवस आम्ही मोठ्या सुखानें राहिलों. अलकनंदेच्या पैलतीरीं एक साधु दिगंबर अवस्थेंत राहात होते. तसेंच मौनीबाबा नामक सत्पुरुषांचें वास्तव्य नारायण पर्वताच्या उतरणीवरील एका कपारींत होतें. त्या दोन महात्म्यांनीं कित्येक वर्षे–वर्फाखालीं नगरी आच्छादलेल्या कालांतही तें स्थळ न सोडतां आपापली साधना अखंड चालू ठेवली होती. माहितगार मंडळी त्या दोन महंतांच्या दर्शनाला आवर्जून जात असलेली आढळली. श्री. देवधर, श्री. सरदार व मी आपापल्या सौभाग्यवतींसह जाऊन त्या दोन पुण्यात्म्यांना वंदन करून व त्यांचा प्रसाद घेऊन आलों.

नारायणाचे मंदिरांत सकाळ–दुपार–सायंकाळ नित्य तीन वेळां आरती होत असे. रात्रीं मंदिरांत विजेच्या दिव्यांचा भरपूर प्रकाश खेळे. मंदिराच्या डाव्या बाजूस एक प्रशस्त ओवरी होती. तेथें मुखावर ज्ञानाचें व साधनेचें तेज असणारा **वीनाधारी** महाराज नामक योगी हातीं वाणा धारण करून बऱ्याच मोठ्या श्रोतृ-समुदायापुढें भजन करण्यांत तल्लीन झालेला आढळला. त्या योग्याचें त्याठिकाणीं रोज सायंकाळीं भजन–गायन व प्रवचनही होत असे. ते सर्व कार्यक्रम लांबवर ऐकूं यावेंत म्हणून ध्वनि-क्षेपकांची व्यवस्थादेखील तेथें केलेली दिसून आली ते वीनाधारी महाराज मराठवाड्यांतील एक उच्चशिक्षित पदवीधर सद्‌गृहस्थ असून आमच्याबरोबर असणाऱ्या डॉ. यशवंतराव यांच्या पूर्व-परिचयाचे निघाले. संगीत व ज्ञान या दोन अमोल गुणांचा उप-योग त्यांनीं अशा सार्वजनिक सत्कार्याप्रीत्यर्थ केल्याचें पाहून त्यांचें मला फार कौतुक वाटलें.

शुक्ल पक्षांतील द्वादशी, त्रयोदशी, चतुर्दशी ( नृसिंह जयंति ) यांसारख्या तिथींना आमचें वास्तव्य साडेदहा हजार फूट उंचीवर, हिमावगुंठीत असणाऱ्या गिरीशिखरावर होतें. त्यामुळें सूर्योदय, सूर्यास्त यांच्याबरोबरीनेंच रात्रीं शुभ्र चांदण्यांत विविध रीतीनें, परोपरींच्या कांतिमय किरणांच्या प्रकाशांत विलसणाऱ्या बदरी-नाथपुरीची अपूर्व शोभा आम्हांला पहावयास मिळाली. आमच्या निवासस्थानासमोर नर पर्वताचें उत्तुंग शिखर होतें. मस्तकावर दह्यादुधाची वादली ओतावी तद्वत् निसर्गानें त्या पर्वतावर केलेला हिमकणांचा वर्षाव चंद्र-सूर्याच्या प्रकाशांत मोठा उठावदार दिसत होता. वरून ओघळत चोहों बाजूंनीं खालीं येणाऱ्या हिममय प्रवाहाच्या रुंदच रुंद ओघांवर चंद्राच्या हिमधवलवत् चांदण्याचा पडणारा प्रकाश अव्याजमनोहर दिसे.

आमचा तिसरा गुरुवार बदरीनाथपुरी येथील धर्मशाळेंत रात्रीं


साजरा झाला. प्रथमत: **पं. धनेशशास्त्री** यांचें सुमारें तासभर स्थान-वर्णनपर हिंदींतून उद्‌बोधक प्रवचन झालें. तदनंतर श्रीदत्त-प्रभूच्या फोटोसमोर आरतीसोहळा नेहमींप्रमाणें पार पडला.

शुक्रवार दि. २२ मे ला श्रीनारायणाचें अखेरचें दर्शन घेऊन आम्ही सर्वांनीं तें धाम सोडलें. सर्व वाट शीघ्र उताराची होती. तीव्र गारठ्यामुळें पहांटे तेथून निघणें सर्वस्वी अशक्य म्हणून सकाळीं नवाचे सुमारास निघावें लागलें. अकरा मैलांचा उतार उतरून थेट पांडुकेश्वरीं पोंचावयास दुपारीं तीन वाजले, त्यामुळें सर्व वाटचाल उन्हांतून करावी लागली. विशेषत: येतांना देव-दर्शनाची व अभिनव सृष्टिसौंदर्य दृष्टीस पडणार या विचाराची आम्हां सर्वांनाच विलक्षण उत्कंठा होती. त्याकारणानें अत्यंत धोकादायक व कठीण मार्ग असतांही आम्हांला अमचें पाऊल मागें घ्यावेसें मुळींच वाटलें नाहीं. पण नारायणाचें दर्शन झाल्या-वर परततेवेळी सर्व पारडें उलटलें. घर गांठण्याची उत्कंठा निर्माण झाली. घर–प्रपंचांतील अडचणी मन:चक्षूंसमोर उभ्या राहिल्या. उत्साह मावळला, गात्रें गळाठलीं, शरीर थकून गेलें व या सर्वां-मुळें प्रवास अत्यंत त्रासदायक वाटूं लागला. एक फर्लांग अंतर चालून जाणेंही अगदीं जिकीरीचें ठरलें. पण मुक्काम गांठणें अपरिहार्य होतें व म्हणूनच बदरीनाथ ते जोशीमठ या दरम्यानचा सोळा मैलांचा पायी प्रवास आम्ही सर्वांनीं मोठ्या मिनतवारीनें पार पाडला.

शनिवार दि. २३ मे ला पहांटे चार वाजतां पांडुकेश्वरहून निघून जोशीमठाच्या दिशेनें आमची वाटचाल चालूं होती. वाटेंतील विष्णुप्रयागच्या रौद्रभयायक संगमावर कॉलऱ्यानें तडका-फडकी देहावसान झालेल्या यात्रेकरूचें एक शव गंगार्पण विधी-प्रीत्यर्थ तेथें आणलेलें दिसलें. गंगेच्या उग्रस्वरूपांत त्या दैवनिष्ठुर दृश्याची अतोनात भर पडली. मला तर त्या करुण-


प्रसंगाकडे मुळींच बघवेना. तथापि विष्णुप्रयाग ते वर पहाडावरील जोशीमठापर्यंत जाणारी तीन मैलांची वाट शिडीच्या पायऱ्याप्रमाणें ऊर्ध्वगतीनें जाणारी होती. ऊर फोडील असा खडा चढ चढून वळणें घेत घेत जाणाऱ्या त्या वाटेवरून खालीं संगमावर असणारें तें शोकदायक दृश्य वारंवार हटकून दिसावें व चढतांना अधिकाधिक धीर खचावा असेंच होत गेलें. अखेर जोशीमठ गांठला एकदांचा. तेथें गेल्यावर कळलें, कीं आदल्या दिवशीं रात्रीं जे प्रवासी तेथें आले होते त्यांतील पंचवीस वर्षांच्या तरुणाला एकाएकी वांत्या व जुलाब होऊन कांहीं तासांतच त्याचें प्राणोत्क्रमण झालें. त्याचेंच शव बरोबरच्या मंडळींनीं गंगार्पण करण्याकरितां पायथ्याशीं असणाऱ्या विष्णुप्रयाग संगमावर नेलें होतें. श्रीनारायण त्या मृताच्या आत्म्यास शांति देवो.

रविवार दि. २४ मेला पहाटें पांच वाजतां मोटारींत बसून आम्ही जोशीमठ हें ठिकाण सोडलें. सकाळीं ९ वाजतां बेलाकुची येथील कुप्रसिद्ध पूल पायीं ओलांडला. पलीकडच्या मोटारींत बसलों व **पीपलकोटीच्या** डाकबंगल्यांत सकाळीं ११॥ वाजतां जाऊन तेथें आम्ही मुक्काम केला. मनाजोगतें स्नान आठ दिवसांत झालेंच नव्हतें. त्यामुळें गरम पाण्यानें आम्ही स्नानें केलीं. भोजन केल्यावर भरपूर विश्रांति घेतली. सायंकाळीं त्या शहरवजा गांवीं फेरफटका करून आलों. रात्रीं भोजनोत्तर पोटभर गप्पा–विनोद झाला. आणि सोमवारीं दि. २५ ला सकाळीं मोटारीनें आमचा जो प्रवास सुरू झाला तो त्याच दिवशीं सायंकाळीं दिवे लागणीच्या सुमारास सुमारें एकशेंअडतीस मैलांचा प्रवास आटोपून आम्ही थेट हृषीकेश गांठलें. दुपारीं श्रीनगर येथें तासभर मोटार थांबवून मोटारींतच आम्ही पुरी–भाजी सेवन केली होती. रात्रीचें भोजन हृषीकेश स्टेशनवरील प्लॅटफॉर्मवर पेट्रोमॅक्सच्या उजेडांत आम्ही पार पाडलें.



श्री केदारनाथ मंदिर

अपघाती पूल : बेलाकुची




(अपघाताची माहिती पान ४१ वर पहा.)

# बदरीनाथपुरी



अलकनंदेच्या अलीकडील तीरावरून समोरच श्री बदरीनाथ मंदिराचें प्रवेशद्वार दिसत आहे.



**श्रीबदरीनाथ मंदिर**

समोर मंदिराच्या प्रवेशद्वाराची कमान (→ खूण पहा.) आणि त्या ठिकाणीं चढून जाव्या लागणाऱ्या पायऱ्या दिसत आहेत.

एवंच, दि. ७ मे ते २५ मे हे दोन्ही दिवस धरून अवघ्या एकोणीस दिवसांत आम्ही दोन धामांच्या अवघड यात्रा पूर्ण केल्या. त्या टापूंतील हवा अनिश्चित व प्रवासाला बव्हंशीं प्रतिकूल असल्यानें दि. २९ मेपर्यंत रेल्वेचा डबा हृषीकेशला ठेवावयास आम्ही रेल्वे अधिकाऱ्यांना आधीं कळबिलें होतें, त्यामुळें चार दिवस आम्ही अगोदर आल्यानें दि. २९ पर्यंत आमचा डबा गाडीला जोडला जाईलच याची खात्री नव्हती. मध्यंतरींच्या एकोणीस दिवसांच्या अवधींत आमच्या डब्यांतील पाणी व वीज यांचा सांठा खलास झाला होता. हृषीकेशला त्याचा पुरवठा होण्याची सोय नव्हती. शिवाय चार दिवस हृषीकेशसारख्या खेडवजा रुक्ष ठिकाणीं राहाण्यापेक्षां हरिद्वारसारख्या रम्य व गजबजलेल्या नगरीं राहतां आलें तर डब्यांतील वीज व पाणी यांच्या पुरवठ्यापासून तो गंगेच्या घाटावरील स्नान-आरती सोहळ्यापर्यंत सर्वकांहीं साधतां येईल असें वाटल्यामुळें हृषीकेशच्या स्टेशनमास्तरांना भेटून आमचा डबा दुसऱ्या दिवशीं सकाळच्या गाडीला जोडून हरिद्वारपर्यंत पाठविण्याचें कार्य दादासाहेबांनीं मोठ्या युक्तीनें घडवून आणलें. येणेंप्रमाणें मंगळवार दि. २६ मे ला सकाळीं दहा वाजतां आमचा डबा हरिद्वार स्टेशनवरील साइडिंग-प्लॅटफॉर्मवर सोडण्यांत आला. त्या प्लॅटफॉर्मवर पंधरा-वीस डबे वेगवेगळ्या यात्रा कंपनीचे उभे असलेले आढळले. मात्र त्या सर्वांत स्वयंपाक-स्नानगृह आदि खास सोय असणारा फक्त आमचाच डबा होता. बाकीच्या डब्यांतील लोकांनीं प्लॅटफॉर्मवर चुली-शेगड्या पेटवून स्वयंपाक आरंभिला असल्याचें दिसून आलें.

चार दिवस हरिद्वारला राहणें कांहीं मंडळींना मानवेना. श्री. नानासाहेब व श्री. बाळासाहेब हे दोघे आपापल्या कुटुंबासह बुधवारीं दुपारीं भाक्रा-नानगल-कुरुक्षेत्र-मथुरा-वृंदावन-आग्रा व फत्तेपूर शिक्री हीं स्थळें पहावयासाठीं स्वतंत्ररीत्या तेथून पुढें

रवाना झाले. उरलेल्या लोकांच्या खास आग्रहाखातर दादा-साहेबांनीं गुरुवारीं दुपारीं मोटार ठरवली व आम्ही बाकीचे लोक हरिद्वारहून मोटारीनें कुरुक्षेत्र येथें गेलों. हरिद्वार आम्ही दुपारीं तीन वाजतां सोडलें. कुरुक्षेत्र येथें आम्ही सायंकाळीं सात वाज-ण्याचे सुमारास पोंचलों. हरिद्वार ते कुरुक्षेत्र या दरम्यानचा आमचा प्रवास मोठ्या मजेंत झाला. विशेषतः गंगेच्या पाण्याचा कालवा समृद्धतेनें आमच्या मोटार रस्त्याशीं समांतर ठेवून कित्येक मैल अगदीं जवळून वाहात होता. त्याच्या पैलतीरावरील रानमळें व लहानमोठी वस्ती आकर्षक दिसत होती. कालव्यांतहि गंगेच्या पाण्याचा वेग वेफाम असलेला दिसत होता आणि पाणी अति निर्मल दिसत होतें.

**कुरुक्षेत्रः**– येथें स्टेशन नजीकच्या एका धर्मशाळेंत रात्रीं आम्ही मुक्काम केला. आजची चौथ्या गुरुवारची रात्र होती व ती आम्ही तेथेंच साजरी केली. पहाटें उठून दुसऱ्या दिवशीं ठरवि-लेल्या टांग्यांनीं सहा मैल दूर असणाऱ्या स्थळांना भेटी द्यावयास आम्ही निघालों. चार मैलांवर प्रथमतः सूर्यकुंड नामक मोठें तळें लागलें. त्याठिकाणीं उतरून सर्वांनीं त्या कुंडांत स्नानें केलीं. पाणी हिरवेंगार व तोंडांत न घेण्याइतकें गलिच्छ होतें. हवेंतही गार-ठाच होता. पण यात्रा करणाराला विधिसंकेत पाळावेच लागतात. त्याला अनुसरून आम्ही खांद्यावरून पाण्याचे चारदोन तांवे ओतून आंघोळीचा विधि उरकून टाकला. त्या तळ्याचें काठीं सूर्य-नारायणाचें मंदिर व आणखीहि इतर देवदेवतांचीं मंदिरें होतीं. त्या सर्वांचीं दर्शनें घेतलीं व तेथून मैलभर अंतरावरील एका विस्तृत तळ्यांत मध्यभागीं असणाऱ्या शिवमंदिरांत आम्ही रवाना झालों. त्या तळ्यांत इतकीं असंख्य कमळें होतीं, कीं तांबूस वर्णाच्या अर्धोन्मिलित कमलिनी पहातांच इतर सर्व गोष्टी पहा-ण्याचें माझ्या मनानें साफ नाकारलें. नंतर सर्वांबरोबर मी जरी

शिवमंदिरांत गेलों होतों तरी तेथें मी काय बघितलें हें माझें मलाच समजलें नाहीं. युद्धांत विजय प्राप्त व्हावा यासाठीं पांडवांनीं त्या शिवालयांत शंकाराची आराधना केल्याचें तदनंतर मला समजलें.

शिव-दर्शनानंतर तेथून अर्धा मैल पुढें गेल्यावर तेथील सुविख्यात बिर्लामंदिर आम्ही पाहिलें. त्या मंदिराचें बांधकाम व मंदिरांतील मूर्ति दिल्ली येथील बिर्लामंदिर ब्रहुकूम आहे. मंदिराच्या प्राकारांत चार घोडे असणारा दगडी रथ त्या स्थळींहि ठेवलेला आहे. मंदिराच्या मागें तसेंच उजव्या व डाव्या बाजूस प्रवाशांना उतरण्या-राहाण्यासाठीं खोल्या बांधल्या आहेत. मंदिरांत वीज व पाणी यांची व्यवस्थाहि केली आहे. हें मंदिर स्थानेश्वर नामक रेल्वेवरील स्टेशनच्या अगदीं नजीक आहे.

बिर्लामंदिर पाहून अर्धा मैल टांग्यानें पुढें गेल्यावर बाणगंगा नामक विहीरीनजीक जाऊन आम्ही उतरलों. भीष्मपितामहांना प्राणोत्क्रमणाचे वेळीं गंगोदक हवें होतें. धनुर्धारी अर्जुनानें जमिनींत बाण मारून गंगा निर्माण केली व त्यांची ती इच्छा गंगोदक त्यांना पाजून पूर्ण केली. त्याच स्थळीं ही मोठी विहीर असलेली आज आम्ही बघितली. विहीरींतील पाणी तोंडांत घेण्यासारखें नव्हतेंच. त्यामुळें आंतील पायऱ्या उतरून त्या तीर्थानें फक्त हात-पाय धुतलें आणि बाणगंगेला वंदन करून आम्ही अखेरच्या टप्प्याकडे वळलों.

अखेरची व महत्त्वाची जागा म्हणजे जेथें अर्जुनाला श्रीकृष्णानें गीतोपदेश केला होता तें संग्रामक्षेत्रांतील परमपवित्र स्थळ होय.

ती जागा कुरुक्षेत्र स्टेशनपासून सहा मैल दूर आहे. त्याठिकाणीं ज्योतिषसर नाम तलाव असून त्या तळ्याचे कांठीं अत्यंत पुरातन असणारा अश्वत्थ वृक्ष आजहि उभा आहे. त्या वृक्षाखालीं गीतोपदेश झाला असल्यानें एका छोटय़ा कोनाडयांत श्रीकृष्ण, अर्जुन व रथ यांच्या प्रतिमा सांप्रत ठेवलेल्या आढळल्या. तो वृक्ष व ती स्मारकची छोटी जागा ज्या जोत्यावर उंचठिकाणीं आहे त्या भागाला गीतामंडप अशी संज्ञा देण्यांत आली आहे. गीतामंडपालगत रामकृष्ण-आश्रम व त्या आश्रमांतील कांहीं खोल्यांतून कौरव-पांडवांच्या प्रतिमा बसविल्या आहेत. आश्रमांत **स्वामी सत्यानंद सरस्वती** नामक वयोवृद्ध-ज्ञानवृद्ध व तेजसंपन्न संन्याशी राहत होते. त्यांच्या दर्शनासाठीं आम्हीं आंत गेलों. त्या प्रेमळ महंतांनीं आपल्या मधुर व अस्खलित वाणीनें त्या पवित्र स्थानाचें महत्त्व विशद करून क्षणभर आम्हांला अध्यात्मविषयांत तन्मय करून सोडलें. "Voice of the Holy Land" नामक एक इंग्रजी वृत्तपत्र दर महिन्याला मिशनमार्फत ते प्रसिद्ध करीत असतात असें समजलें. वार्षिक वर्गणी फक्त एकच रुपया होती. आमच्यांतील बऱ्याच जणांनीं रुप-रुपया देऊन वर्गणीदार म्हणून नांवें नोंदविलीं. त्या वृत्तपत्राचें अंक तदनंतर न चुकतां अद्याप आमच्याकडे येत आहेत.

अशा रीतीनें कुरूक्षेत्र व गीता-प्रसव स्थान पाहाण्याची संधि सवड सांपडतांच आम्ही साधून घेतली. शुक्रवारीं दुपारीं मोटारीनें आम्हीं कुरूक्षेत्र सोडलें व सायंकाळीं पुनः हरिद्वार येथें परतलों. हरिद्वारला आमचा काल मोठ्या आनंदांत गेला हें वेगळें सांगावयास नकोच. आम्हां सर्वांनाच तेथें कांहीं निवडक वस्तू विकत

घ्यावयाच्या होत्या. प्रसादादाखल आप्तेष्टांना द्यावयासाठीं गंगा-जलभरित लहान लहान गडू घ्यावयाचे आम्ही ठरविलें होतें. त्याप्रमाणें गंगा-जम्नी रंगाच्या छोटचा आकाराच्या गिडचा आम्ही खरेदी केल्या. त्यांत गंगाजल भरलें व त्यांचीं तोंडें झाळून बंद करून घतलीं. सायंकाळीं गंगेच्या घाटावरील तरत्या दीपनौका व आरतीचा समारंभ आणखीं दोन वेळां पाहून आम्ही आमच्या मनाचें भरपूर समाधान केलें.

दि. २९ मे ला शुक्रवारीं आमचा रेल्वेचा डबा ठरल्याप्रमाणें प्रथमत: दिल्लीपर्यंत पुढें नेण्यांत आला. दि. ३० ला दिल्लीं स्टेशनवरच दिवसभर तो थांबणार असल्यानें आम्ही दिल्लीं शहरांत सर्वत्र हिंडून आलों. कुतुबमिनार, लालकिल्ला, जंतर-मंतर, बिर्लाभवन, राजघाटावरील महात्माजींची समाधि हीं सर्व स्थळें आम्हाला अनायासें पहावयास सांपडलीं. दि. ३० ला प्रारंभीं नव्या दिल्लींला आमचा डबा नेण्यांत आला व तेथून पुढें पठाणकोट एक्स्प्रेसला तो जोडण्यांत येऊन आम्हीं घराच्या दिशेनें यावयास वेगानें निघालों. आग्रा स्टेशनवर श्री. नानासाहेब व श्री. बाळासाहेब सहकुटुंब आमच्यांत येऊन सामील झाले. पुढें मनमाडला आमचा डबा सोडण्यांत आला व मग तो पॅसेंजरनें मनमाड-दौंड या मार्गानें पुण्यास येऊन मंगळवार दि. २ जून रोजीं दुपारीं १॥ वाजतां दाखल झाला. योगायोग असा कीं, २ मे ला आम्ही पुणें सोडलें होतें आणि परतलों त्या दिवशींची तारीख २ जून हीच होती.

★ ★ ★

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८१५६ ... वि: भू-प्रवास

येणेप्रमाणें बदरीकेदार व बदरीनाथ या दोन–धाम यात्रांचा सविस्तर अहवाल आतांपर्यंत मीं सादर केला आहे. ही सर्व माहिती त्या ठिकाणीं जाणाऱ्या नवख्या प्रवाशांना जास्तींत जास्त उपयुक्त व्हावी अशा पद्धतीनें मुद्दाम सांगितली असून या पुस्तकाचे शेवटीं प्रवासाप्रीत्यर्थ सांप्रत येणारा खर्च, एकंदर करावा लागणारा प्रवास, हिमालय विभागांतील या दोन यात्रांच्या वाटेवर लागणारीं प्रमुख गांवें, त्यांची समुद्रसपाटीपासून असणारी उंची व त्यांचीं वैशिष्टयें आदि संकलनात्मक माहिती परिशिष्ट विभागांत दिली आहे. यानंतर ज्या उत्कृष्ट सोयीमुळें या अवघड यात्रा यशस्वीरीत्याच केवळ नव्हें तर अत्यंत सुखासमाधानांत पार पडल्या त्या **दत्त दिगंबर यात्रा कंपनी**ची आणि तिचे संचालक **दादासाहेब** यांचीं (प्रवासाच्या अवधींत मला जो प्रत्यक्ष अनुभव आला तोच जमेस धरून) जी माहिती सांगणें प्रवाशांच्या दृष्टीनें आवश्यक वाटते ती द्यावयाचा माझा विचार आहे.

**दत्तात्रय दिगंबर ऊर्फ दादासाहेब कुलकर्णी** यांच्या नांवाचा उल्लेख उपरोक्त वर्णनांत ठिकठिकाणीं आलाच आहे. आमच्या बरोबर सुमारें पन्नास स्त्री–पुरुषांचा समूह होता. त्यांत आचारी-वाढप्यापासून तो नामवंत डॉक्टर-वकीलांपर्यंत विविध पेशांतील लोक होते. त्यांच्यांत आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दर्जाचे बाबतींत जशी एकवाक्यता नव्हती तद्वत् त्या सर्वांच्या आवडी-निवडी, त्यांचीं मतें, त्यांचे आचार-विचार व त्यांच्या स्वभावांतील विवक्षितपणा यांच्यांतही परस्पर-पोषकतेपेक्षां परस्पर-भिन्नताच अधिक असावी यांत कांहीं नवल नव्हतें. यात्रेनिमित्त कंपनीला सर्वांनींच सारखे पैसे दिले होते. त्यामुळें प्रत्येकाला आपापल्या इच्छेप्रमाणें प्रत्येक गोष्ट तावडतोब व्हावी असें वाटणें अगदीं स्वाभाविकच होतें. उदाहरणार्थ, मोटारींतून प्रवास करतांना पुढच्या कंपार्टमेंटमध्यें जेमतेम दहा सीटस् असणार ! पण जरी सर्वांनीं सारखे पैसे दिले असले तरी एकाच वेळीं तीस-पस्तीस मंडळींना फ्रंट सीटवरील जागा देणें कंपनीला कसें शक्य व्हावें बरें? रात्रीं निजावयाची सोय रेल्वेच्या डब्यांत करण्याचे बाबतींतही सर्वच मंडळींनीं नियमाप्रमाणें असणारी अधिक रक्कम देऊन बाक व बर्थ यावरच

निजावयाचा हट्ट धरल्यास तसें करतां येणेंही अशक्यच नव्हें काय? ( बाकावर व बर्थवर झोपावयासाठीं अधिक पैसे द्यावे लागतात ) तात्पर्य, या व अशासारख्या क्षुल्लक पण पेंचप्रसंग निर्माण करणाऱ्या अगणित बाबी वारंवार उद्भवाव्यात आणि त्यांतून दरएक वेळीं सुटका करून घ्यावयासाठीं दादासाहेबांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा करावी असेंच सत्र सतत चालू होतें. एवढ्या भिन्न भिन्न प्रकृतीच्या लोकांना प्रत्येक बाबतींत सांभाळून घेऊन, शक्य तों त्यांना न दुखवतां आपला नियोजित कार्यक्रम निर्धारानें व अचूक पार पाडणें हें काम कांहीं सामान्य प्रकारचें नव्हेच नव्हे! तें करावयासाठीं अंगीं तसें कौशल्य तर हवेंच, पण सोशिकपणा, गांभीर्य, धीरोदात्तता, हजरजबाबी वृत्ति व तडफदारपणा यांसारख्या सद्‌गुणांचें भरपूर सहाय्यही समयानुसार अवश्य हवेच हवें! दादासाहेबांच्या ठायीं या आवश्यक गुणांचें वास्तव्य परिपूर्ण होतें हें वेगळें सांगावयास नकोच. एरवी प्रतिवर्षी किमान आठदहा वेळां कंपनीतर्फे वेगवेगळ्या ठिकाणच्या सहली काढणें व त्या यशस्वीरीत्या पार पाडणें त्याना कितपत शक्य ठरेल याचा सूज्ञांनीं आपापल्या मनाशींच विचार केलेला बरा!

पुणें ते मुंबई या दरम्यानचा मामुली प्रवास जरी सहकुटुंब आपल्याला करावयाचा झाला तरी आपल्याला कोण पंचाईत पडते. गडबडींत कांहीं गोष्टी बरोबर घ्यावयाच्या ऐनवेळीं साफ विसरतात, नको असणाऱ्या बरोबर येतात, कांहींची स्मृति फार उशीरा होते, तर कांहीं वस्तू प्रत्यक्ष जवळ असतांही त्यांची आपणास आठवणच नसते. एक ना दोन अनेक परींनीं छोट्या वा मोठ्या प्रवासांत आपली नित्य कुचंबणाच होत असते. हा न्याय कंपनीच्या प्रचंड खटाटोपास लावावयाचा झाला तर बदरीकेदार-बदरीनाथ यासारख्या दूरस्थ प्रवासाची महिनाभर पुरेल एवढी सर्व प्रकारची सिद्धता बरोबर घ्यावयाची ही गोष्ट कांहीं सोपी नव्हें. केरसुणीपासून तो जिलबीसारखें पक्वान्न तयार करावयासाठीं लागणाऱ्या सर्व वस्तू हाताशीं ठेवणें व त्यांची उणीव मुळींच भासूं न देणें हें कार्य तारेवरील कसरतीप्रमाणें प्रशंसनीय नव्हें काय? दादासाहेब व त्यांची यात्रा कंपनी यांनीं एतद्विष-

यक घेतलेली दक्षता म्हणूनच मला स्तुत्य व कौतुकास्पद वाटली हें येथें नमूद केलें पाहिजे.

दादासाहेबांचा बहुश्रुतपणा, त्यांच्याजवळ असणारी विविध अनुभवांची जंत्री, विशेषत: त्यांचा गोष्टी वेल्हाळपणा तर असा विलक्षण होता, कीं संभाषण एकदां सुरू झालें कीं किमान तास दीड तास त्यांत गेलाच म्हणून समजावें. नमुन्यादाखल याच प्रवासांत त्यांच्या तोंडून ऐकलेल्या पुढील दोन गोष्टी पहाव्यात:—

रेल्वेंतून सेवानिवृत्त झालेले एक गृहस्थ प्रवासांत आमच्याबरोबर होते. त्यांना रेल्वेंतील सर्व अधिकारी स्वत:पुढें क:पदार्थ वाटत. आपल्या वशील्यानें रेल्वेंतील हवें तें काम अद्यापही करतां येण्याजोगें आहे अशी त्यांची समजूत होती व तसे ते दादासाहेबांपुढें वारंवार बोलून दाखवीत होते. झांशी स्टेशनवर आमची गाडी उभी राहिली. आमच्या दालनांतील विनोदसाम्राट श्री. बाळासाहेब इकडून खालीं प्लॅटफॉर्मवर उतरले. तिकडे दादासाहेब व तदनंतर ते गृहस्थ उतरून प्लॅटफॉर्मवर आले. बाळासाहेब समोरून येत असतांना पाहून दादासाहेबांनीं त्यांना नमस्कार केला. तत्पूर्वी त्या गृहथांनीं बाळासाहेबांना पाहिलेंच नव्हते. ही गोष्ट लक्षांत घेऊन दादासाहेब, बाळासाहेब व ते सद्‌गृहस्थ यांच्या दरम्यान पुढील नाटयपूर्ण संवाद घडून आला.

दादासाहेब बाळासाहेबांशीं हस्तांदोलन करीत आश्चर्यानें—

"ओ हो ! आपण या स्टेशनवर बदलून आलांत वाटतं ?"

बाळासाहेब—"होय. महिना झाला मला इथं येऊन !"

दादासाहेब (त्या सद्‌गृहस्थांनाउद्देशून)—"काय, यांना तुम्ही ओळखलं नाहीं ? इथं ते स्टेशनमास्तर आहेत ना ?"

सद्‌गृहस्थ—' वा! ओळखलं नाहीं असं कसं होईल! कित्येक वर्षांपासून

यांचा माझा दाट परिचय आहे ना ! यांचं नांवही कालपरवांपर्यंत ध्यानांत होतं माझ्या ! काय साहेब खरं कीं नाहीं ?"

बाळासाहेब ( कृत्रीम हंसून )--" अगदीं खरं ! एकदां झालेली ओळख विसरते थोडीच ? ती कायमच राहणार."

सद्‌गृहस्थ (बाळासाहेबांना दिलगिरीपूर्वक) —" बरं तें राहूं द्या ! नांव काय बरं तुमचं ! तुमची माझी भेट यापूर्वी कुठं बरं झाली होती ?"
बाळासाहेब (चटकन्)-" माझं नांव **बाळासाहेब बहुधनी**. मी तुमच्याच डब्यांतून यात्रेला आलों आहें. तुमची व माझी भेट याक्षणीं अगदीं प्रथमत: होते आहे. आणि त्याबद्दल मला फार आनंद वाटतो आहे."

बाळासाहेबांच्या या खुलशानंतर त्या तिघांचेही चेहरे पहाण्याजोगे झाले असतील हें काय सांगावयास हवें ?

★ ★ ★

दुसरा प्रसंग हरिद्वारच्या साइडिंग-प्लॅटफॉर्मवर घडून आला तो असा.

त्या ठिकाणीं नळाजवळ एक रिकामी कॉट पडून होती. दिवसभर येणारे जाणारे लोक तीवर येऊन क्षणभर टेकत व निघून जात रात्रीं नवाचे सुमारास त्या मोकळ्या कॉटवर बिछाना पसरून दादासाहेब तीवर पडून राहिले. अंमळशानें रेल्वेचा एक कुली येऊन बराच वेळपर्यंत त्याठिकाणीं बसून राहिला. ती गोष्ट लक्षांत आल्यावर इतरांशीं बोलण्यांत दंग झालेले दादासाहेब त्याच्याशीं बोलू लागले. त्या दोघांत झालेलीं प्रश्नोत्तरें येणें प्रमाणें:-

दादासाहेब—" कोण रे तू बाबा ? इथंच नोकरी करतोस वाटतं ?"

कुली (अदबीनें)—" होय साब. तीस वर्सं झालीं मी इथंच काम करतुया !"

दादासाहेब—" कसलं काम आहे तुझ्याकडं ! मुकादम आहेस वाटतं !"

कुली—" नव्हं ! मेहतर आहे जी "

दादासाहेब (चमकून)—" कोण मेहेतर आहेस ! तर मग यावेळीं इथं कोणतं काम आहे तुझं ?"

कुली—" रातचा मी इथं झोपत असतो धनीसाब !"

दादासाहेब—"अस्सं, ठीक आहे. तुझी सोबत उपयोगीच पडेल आमच्या. कुठं झोपतोस तूं ?"

कुली— " खाटेवर ! ज्यावर तुम्ही झोपलांत ती खाट माझीच आहे धनी."

एवढें वाक्य ऐकलें मात्र. वीजेचा धक्का बसावा तसें दादासाहेब उठले असतील व पथारी गुंडाळून ती कॉट तत्काळ मोकळी करून त्यांनीं त्याला दिली असेल हें काय वेगळें सांगावयास हवें !

सारांश, दादासाहेबांच्या संग्रहांत अशा गंमती जमतीचे अनुभव शेंकडों आहेत. सांगतांना त्यांची व ऐकताना आपली हंसून हंसून किती त्रेधा होते हें प्रत्यक्ष अनुभवानेंच कळूं शकेल.

★ ★ ★

वस्तुत: दादासाहेबांबद्दल भरपूर माहिती सांगितल्यानंतर **दत्तदिगंबर यात्रा कंपनी**संबंधीं निराळी माहिती द्यावयाचें मुळींच कारण नाहीं म्हणा ! पण तरीही कंपनीतर्फे व दादांच्याच व्यवस्थेखालीं प्रवास केल्यामुळें इतर यात्रेकऱ्यांपेक्षां आमच्या ज्या कांहीं खास सुखसोयी झाल्या त्यांची महति मला विशेषत्वानें वाटली. प्रत्येकाचें लक्ष त्या सोयींवर केंद्रीत करणें अनुभवामुळें मला अगत्याचें वाटत असल्यानें कंपनीमार्फत लाभणाऱ्या अमोल सुखसोयींचें महत्त्व थोडक्यांत सांगून मी हें लेखन पूर्ण करणार आहें.

(१) कंपनीला रेल्वेकडून खास डबा मिळतो. त्यांतील प्रत्येक बाकावर बसावयासाठीं कंपनीनें स्वत:च्या खर्चानें गाद्या तयार करवून घेतल्या आहेत. त्यामुळें सर्व प्रवास 'फर्स्ट क्लास' मधून केल्याप्रमाणें वाटतें.

दर एक स्टेशनवर तुफान गर्दी असतांही आपल्या डब्यांत त्या गर्दीचा उपसर्ग होण्याची मुळींच भीति नसते. मुक्कामाचे ठिकाणीं चढण्या-उतरण्याची धांवपळ आपल्याला करावी लागत नाहीं. रात्रीं झोपावयाची सोय डब्यांतच अगदीं उत्तम होते.

(२) डब्यांत स्नान, चहा, भोजन यांची सोय व तीही कंपनीच्या नोकरांकडून वेळचे वेळीं होते महिनाभर प्रवास चालू राहिला तरी आपल्या दैनिक नित्यक्रमांत घरच्या सारखी सर्व सोय न सांगता होत असते.

(३) कंपनीच्या मार्गदर्शनाखालीं व सहप्रवाशांच्या संगतींत हिंडण्याचे सर्व कार्यक्रम नेहमीं पार पडतात. त्यामुळें अनोळखी प्रांतांतील परक्या वाटाड्याची आवश्यकता आपल्याला भासत नाहीं.

(४) प्रवासांत आजार वा किरकोळ दुखणें-खुपणें सुरू झालें तरी अनेक सहकाऱ्यांचा फार मोठा आधार वाटत असतो. तसेंच कंपनीतर्फे औषधाची व्यवस्था होऊन इतरांच्याही अनुभवी उपाय–योजनांमुळें प्रकृतीला चटकन आराम वाटू लागतो असें मला प्रत्यक्ष दिसून आलें आहे.

(५) लांबचा अनेक दिवसांचा प्रवास असतो तेव्हां बरोबर किती तरी सामान घ्यावेंच लागतें. कंपनीच्या स्पेशल डब्यामुळें विपुल सामान तर नेतां येतेंच, शिवाय पोटापाण्याचा प्रश्न कंपनीच्या आश्रयामुळें अजिबात मिटत असल्यानें तद्विषयक अवजड ओझें आपणाला मुळींच वागवावें लागत नाहीं.

(६) दादासाहेबांसारखा दक्ष व्यवस्थापक कंपनीबरोबर असल्यामुळें वेळप्रसंगीं पोस्टकार्डापासून तो दंतमंजनापर्यंत ऐनवेळीं कोणतीही वस्तु लागलीं तरी डब्यांत बसल्या ठिकाणीं मिळू शकते. मग आणखी काय हवें ?

(७) हृषीकेश पासून पुढील प्रवासांत ठिकठिकाणीं जरी अल्पोपाहाराचीं दुकानें वा पाण्याचे प्रवाह आढळतात तरी दुकानांतील बहुतेक खाद्य पदार्थ शिळे, प्रकृतीला अपायकारक व विशेषतः महाराष्ट्रीय मंडळीला ज्यांचा

वास वा चव कदापि घेववणार नाहीं अशा प्रकारचे असतात. एवढेंच नव्हें तर त्यांच्या कडील मोकळा ग्लास वा पाणी प्यावयाचें भांडें क्षणभर जरी वापरावयासाठीं घेतलें तरी त्याला विवक्षित तेलकटपणाची अशी कांहीं घाण येत असते कीं त्यांतून साधें पाणी देखील प्यावेसें वाटत नाहीं.

ही झालीं भांड्याची कहाणी. पाण्याची गोष्ट तर फारच गंभीर आहे. त्या भागांत दृष्टीला हवें तेवढें पाणी सर्वत्र दिसत असतें. मंदाकिनी आणि अलकनंदा या दोन नद्या तर शभर मैलांच्या पायीं प्रवासांत अक्षय आपल्या मार्गाजवळून वाहात असतात. पण तेथील पाण्यांत अभ्रकाचें कण व कांहीं खनिज द्रव्यें अशीं असतात कीं वाहणारें तें पाणी पचवितां येणें आपल्याला सर्वस्वी अशक्य ठरतें. कॉलऱ्याच्या इंजेक्शनची सक्ति त्याठिकाणीं जाणारा-वर याकरितांच केली जाते. 'पीने का पानी' अशा तऱ्हेची सूचना जेथें असेल त्याच ठिकाणचें पाणी प्यावयासाठीं वापरणें अत्यंत इष्ट ठरतें. उत्तर सरकारनें आरोग्याबद्दल शंभर मैलांचे टापूंत ठिकठिकाणीं लिहून ठेवलेल्या त्याच त्या अनेकप्रकारच्या सूचना अत्यंत हितकारक व उपयुक्त ठरतात. नमुन्यादाखल त्यांतील पुढची एक महत्वाची सूचना पहावी—

बासी ( शिळें ) भोजन गंधा ( अशुद्ध ) पानी ।
बिमारीकी यही निशानी ॥

**'शरीरमाद्यंखलुधर्मसाधनम्'** या उक्तीनुरुप कंपनीच्या आश्रयाचा अवलंब करणाराला खाण्या पिण्याची बाधा होणें तर सर्वथैव अशक्यच आहे. पण उलटपक्षीं हिमालय विभागांतही वरण-भातापासून शिरा-पुरीपर्यंत घरच्या सारखें चमचमीत व सुग्रास भोजन जर हवें तेव्हां आपणास मिळत असेल तर ही सर्वश्रेष्ठ प्रकारची सोय किती महत्त्वाची आहे बरें ?

( ८ ) जी गोष्ट खाण्यापिण्याची तीच स्नानाची. रुद्रप्रयाग सोडून जसजसें पुढें जावें तसतसा गारठा अधिकाधिक भासूं लागतो. गार पाण्यानें स्नान उरकणें तर अशक्यच, पण हात, पाय वा तोंड धुवावयास एवढेंच

नव्हें तर प्यावयासही गार पाणी मुळींच चालत नाहीं. कंपनीच्या 'लाईन-दोरी' मुळें गरम पाणी हवे तेव्हां मिळूं शकते व आपली चांगली सोय होते.

( ९ ) पायीं प्रवास सुरू होताच दादासाहेबांनीं उत्तररात्रीं तीन वाजतां उठून शिट्टी वाजवावी. सर्वांना जागें करावें. प्रातर्विधि, चहापान, सामानाची आवरासावर या क्रिया एका तासांत आमच्याकडून त्यांनीं करवून घ्याव्यात. चार वाजतां दुसरी शिट्टी झाली कीं प्रथम पायी चालणारांचें पायदळ बाहेर पडे. त्यांच्यामागोमाग अर्ध्या तासानें कंडी व दंडीत बसून जाणारे आमचे सहकारी आणि सर्वांत शेवटीं सुमारें पांच वाजतां घोड्यावरून निघणारे घोडेस्वार वाट चालू लागत. या सोयीमुळें पुढच्या मुक्कामीं सर्व मंडळी जवळजवळ एकाच वेळीं पोंचावयास मदत होई. हा खटाटोप स्वतंत्ररीत्या जाणाऱ्या प्रवाशांना कितपत अचूक पार पाडता येण्याजोगा आहे बरें ? त्याला मुरब्बी सूत्रधारच नको काय ? दादासाहेबांच्या शिट्टीची आठवण अद्याप रात्रीं तीन ते चार या दरम्यान जागा झालों कीं मला होत असते.

( १० ) सर्वांत शेवटची गोष्ट म्हणजे महिनाभर आमच्याबरोबर आमचें सर्व सामान जरी होतें तरी त्याची जबाबदारी, धास्ती व नें–आण याची आम्हाला अक्षरशः फिकीर नव्हती. कौतुकाची गोष्ट अशी कीं सर्व सामान गडी-माणसांच्या स्वाधीन असताही प्रवासांत आमचें पै-पाव आण्यानें नुकसान झालें अथवा एकादी वस्तु चोरीला गेली असें अपवादादाखलही झालें नाहीं. तेव्हां ही सोय उपेक्षणीय नसून किती महत्त्वाची आहे याचा अवश्य विचार करावा.

एकंदरींत कंपनीच्या व दादासाहेबांच्या चोख व्यवस्थेमुळें आमची दोन ठिकाणची अवघड यात्रा अत्यंत सुखानें पार पडली. यापुढें केव्हांही कोणत्याही सुविख्यात स्थळीं जावयाचें मनांत आलें तर नुकत्याच आलेल्या प्रत्यक्ष अनुभवास अनुसरून **दत्त दिगंबर यात्रा कंपनीच्या** आश्रयानेंच

प्रवास करावयाचा किंबहुना तशी संधि वारंवार यावी व रोजच्या रूक्ष व त्रासदायक व्यवहारी जीवनांत कांहीं दिवस प्रवासांचें सौख्य मिळाल्यास तें अवश्य भोगावें असाच निर्धार मी माझ्या मनाशीं करून टाकला आहे. हें पुस्तक वाचणाऱ्या प्रत्येक वाचकाचें याबाबतींत माझ्याशीं सहमत होईल यांत मला मुळींच शंका नाहीं. अखेर माझ्या नित्यपरिपाठांतल्या श्री सद्‌गुरू स्तवन-पर श्लोकानें मी माझें लेखन परिपूर्ण करतों.

ज्या ज्या ठिकाणीं मन जाय माझें।
त्या त्या ठिकाणीं निजरूप तूझें ॥
मी ठेवतों मस्तक ज्या ठिकाणीं।
तेथें तुझे सद्‌गुरु पाय दोन्हीं ॥

श्री बदरीविशाल लाल कीं जय। श्री गुरुदेव दत्तात्रेयार्पणमस्तु

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६१५५ विः भ्र प्रवास
क्रमांक १७२ नों: दि: ५/२/६०
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. १०८९७
शाखा

# परिशिष्ट अ

## प्रवासांतील सहभागी स्त्री-पुरुषांचीं नांवें

| नांव | मंडळींची संख्या | गांव |
|---|---|---|
| श्री. नानासाहेब व सौ. इंदिराबाई वैद्य | २ | पुणें |
| ,, बाळासाहेब व सौ. सुशीलाबाई बहुधनी | २ | ,, |
| प्रा. स. रा. भट व सौ. लक्ष्मीबाई भट | २ | ,, |
| श्री. ल. के. तांबे व सौ. व लता तांबे | २ | ,, |
| ,, भि. गो. सरदार व सौ. यमुनाबाई सरदार | २ | अंबरनाथ |
| ,, ह. वा. गोरे व सौ इंदिराबाई गोरे | २ | ठाणा |
| ,, वि. त्रि. देवधर व सौ. इंदुमती देवधर | २ | कल्याण |
| डॉ. यशवंतराव व सौ. सरस्वतीबाई | २ | हैद्राबाद |
| श्री. बापूसाहेब व सौ. पार्वतीबाई सबनीस | २ | कल्याण |
| ,, र. द. सवाई वकील | १ | पुणें |
| ,, गं. वा. भिडे | १ | कल्याण |
| ,, त्र्यं. कृ. पानसरे | १ | डोंबिवली |
| गं. भा. अंबूबाई मुदखेडकर | १ | औरंगाबाद |
| श्रीमती जानकीबाई भिडे | १ | डोंबिवली |
| ,, इंदिराबाई पटवर्धन | १ | ग्वाल्हेर |
| ,, पार्वतीबाई परांजपे | १ | पुणें |
| ,, हीराबाई सुर्वे | १ | कोल्हापूर |
| ,, दमयंतीबाई वाघ (दादासाहेबांची मेव्हणी) | १ | पुणें |
| श्री. सौ. कुसुमताई भार्गव | १ | जामनगर |
| ,, ,, सत्यभामाबाई राजवाडे | १ | अकोला |
| ,, ,, मथुबाई पावसकर | १ | दादर |
| ,, ,, सरस्वतीबाई वैद्य | १ | पुणें |
| ,, ,, लक्ष्मीबाई भागवत | १ | भोर |
| श्री. दत्तात्रय दिगंबर कुलकर्णी ( चालक ) | १ | पुणें |
| ,, रा. प्र. जोशी ( व्यवस्थापक ) | १ | ,, |
| ,, कुलकर्णी, श्री. दामले, श्री जोशी (आचारी ) | ३ | ,, |
| कृष्णा, शंकर, बाबू ( खलाशी ) | ३ | ,, |

# परिशिष्ट ब

## प्रवाससंबंधीं उपयुक्त आंकडेवारी व माहिती :—

### १. रेल्वे प्रवास (एकेरी)

| गांवें | अंतर मैल | आकार रु. न.पैसे |
|---|---|---|
| पुणें ते मुंबई | ११९ | ४-५६ |
| मुंबई ते हरिद्वार (टूरिस्ट तिकीट 'ए' | ११६१ | ४२-३२ |
| हरिद्वार ते हृषीकेश (बसभाडें) | १५ | ००-८८ |
| एकूण रेल्वेप्रवास मैल | १२९५ | ४७-७६ |

### २. मोटार प्रवास (एकेरी)

| | | |
|---|---|---|
| हृषीकेश ते श्रीनगर | ६४ | ४-४४ |
| श्रीनगर ते रुद्रप्रयाग | २० | १-३१ |
| रुद्रप्रयाग ते काकडाघाट | २४ | १-२५ |
| रुद्रप्रयाग ते पीपलकोटी | ४४ | ३-१२ |
| पीपलकोटी ते बेलाकुची | ४ | ०-३७ |
| बेलाकुची ते जोशीमठ | १५ | ०-९५ |
| एकूण मोटार प्रवास मैल | १७१ | ११-४४ |

### ३. पायीं वा इतर साधनांनी एकेरी प्रवास

| | | |
|---|---|---|
| (अ) | काकडा घाट ते गुप्तकाशी | ३॥ मैल |
| | गुप्तकाशी ते फाटाचट्टी | ८ |
| | फाटाचट्टी ते रामपूर | ४ |
| | रामपूर ते गौरीकुंड | ४ |
| | गौरीकुंड ते केदारनाथ | ७ |
| (ब) | जोशीमठ ते विष्णुप्रयाग | ३ |
| | विष्णुप्रयाग ते पांडुकेश्वरे | ५ |
| | पांडुकेश्वर ते हनुमानचट्टी | ६ |
| | हनुमानचट्टी ते बदरीनाथ | ५ |
| | एकूण वाटचाल मैल | ४५॥ |

एकूण जातांयेतां प्रवास ३०२२ खर्च ११८·४०

# परिशिष्ट क

आम्ही प्रवासांत पाहिलेल्यां निवडक व ठळक स्थळांचीं विशेष माहिती. त्यांचें वर्णन या पुस्तकांत ज्या पानावर देण्यांत आलेलें आहे त्या पानांचा आंकडा शेवटीं कंसात दिला आहे. समुद्रसपाटीपासून उंची दर्शक आंकडा प्रारंभींच्या कंसांत दिला आहे.

**१ हरिद्वार :— (९२४)**

नॉर्थ रेल्वेवरील स्टेशन. सप्तपुऱ्यापैकी एक. गंगेला याच ठिकाणीं प्रथमतः घाट बांधल्यानें त्याला "हरी की पायरी" असेंही म्हणतात. गुरुकुल कनखल-तीर्थ, सप्तधारा व सप्तऋषी यांचे आश्रम (पान ६)

**२ हृषीकेश :— (१११६)**

हरिद्वारपासून १५ मैलावर असणारे अखेरचें रेल्वे स्टेशन. येथें भरत मंदिर, लक्ष्मण झुला, स्वर्गाश्रम, गीतामंदिर व बाबा श्री काली-कमळीवाले यांच्या संस्थेचे मध्यवर्ति केंद्र हीं स्थळें पहावीत. (पान ११)

**३ देवप्रयाग :— (१५५०)**

भागीरथी (गंगा), अलकनंदा व सरस्वती या गुप्त नद्यांचा संगम, रघुनाथ, गरूड व श्रीशंकर यांचीं मंदिरें पहाण्याजोगी आहेत. येथें पोस्ट, तारऑफीस, हॉस्पिटल व डाक बंगला या सोयी आहेत. (पान १७)

**४ श्रीनगर :— (१९००)**

गढवालप्रांतांतील मोठें शहर. पूर्वी गढवालनरेशांची ही राजधानी होती. येथें पोस्ट-तार ऑफीस, डाकबंगला, हॉस्पिटल आदि सोयी आहेत. (पान५६)

**५ रुद्रप्रयाग :— (२०००)**

अलकनंदा व मंदाकिनी या नद्यांचा संगम. गंगेचे, रुद्रनाथ महादेवाचें मंदिर व संस्कृत महाविद्यालय. बदरीकेदार व बदरीनारायण या दोन धामांच्या वाटा येथून वेगवेगळ्या होतात. पोस्ट तारऑफीस, हॉस्पिटल व डाकबंगला या सोयी आहेत. (पान १९)

**६ काकडा :—**

रुद्रप्रयागपासून २४ मैलावर असणाऱ्या या ठिकाणापर्यंत मोटारनें आम्हाला जातां आलें. येथून केदारनाथाचा पुढील २६॥ मैल प्रवास पायी करावा लागतो. अथवा दंडी कंडी वा घोडा करावा लागतो (पान २१)

**७ गुप्तकाशी :— (४८५०)**

मनकर्णिका कुंडांत स्नान व गुप्तदानें. काशीविश्वेश्वराचें मंदिर व पोस्ट ऑफीस आहे. (पान २२)

**८ उखीमठ :-- (४३००)**

उषा व अनिरुद्ध यांच्या विवाहाचें ठिकाण. केदारनाथाचे थंडीच्या कालांतील वास्तव्यस्थान. ओंकारेश्वर मंदिर. येथें पोस्ट ऑफीस, हॉस्पिटल, डाकबंगला या सोयी आहेत. (पान ३८)

**९ त्रिजुगीनारायण :— (८०००)**

शंकरपार्वतीचे विवाहाच्या वेळचा अग्नि प्रज्वलित ठेवलेला आहे. देवळांत विष्णु, अन्नपूर्णा गणपति व शिवलिंग आहे (पान ३९)

**१० गौरीकुंड:— (६५००)**

गरम पाण्याचे अक्षय वाहणारें कुंड. या कुंडात पार्वती (गौरी)नेहमी स्नान करी. शिवलिंग व पार्वतीचें मंदिर. येथे डाकबंगला आहे. (पान२८)

**११ केदारनाथ :— (११,७५०)**

बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक स्थान. थंडपाण्याचीं चार कुंडें. आद्यश्रीशंकराचार्यांची समाधी. मंदाकिनी व मोरगंगा या नद्यांचें उगमस्थान. पोस्ट व डाकबंगला. (पान ३३)

**१२ पीपलकोटी :-- (४०००)**

बदरीनाथाच्या मोटार रस्त्यावर लागणारे (अखेरचें) मोठें गांव. येथे डाकबंगला, धर्मशाळा,पोस्ट-तारऑफीस व मोठी बाजारपेठ आहे. (पान५६)

**१३ बेलाकुची:—**

पीपलकोटीपासून ४ मैलावरील स्थान. येथें अलकनंदेवरील पुलाचें काम चालू होतें. पोस्ट, तार ऑफीस व डाकबंगला आहे. (पान ४०)

**१४ जोशीमठ :— (६१६०)**

गंधमादन पर्वतावरील स्थान. श्रीशंकराचार्यांचे पीठ, श्रीनृसिंह, वासुदेव, गरूड भगवान, नवदुर्गा आदि देवळें. दंडधारा स्नान. येथून कैलास पर्वताचें दर्शन होतें. पोस्ट,तारऑफीस,हॉस्पिटल व डाकबंगला. (पान४३)

**१५ पांडुकेश्वर :— (६०००)**

ध्यानबदरी व वासुदेव यांची दोन मंदिरें, मंदिरासमोर 'पांडवशिला' आहे. पोस्ट व डाकबंगला. (पान ४५)

**१६ बदरीनाथ :— (१०२४३)**

श्री बदरीविशाल मंदिर. तप्तकुंडांत स्नान. ब्रह्मकपाल येथें पिण्डदान. पोस्ट, तारऑफीस, हॉस्पिटल, डाकबंगला आहे. (पान ५२)

★ आपल्या तळहातावरहि एकादें असामान्य चिन्ह असूं शकेल.

★ ★ त्या चिन्हाचा आशय समजावून घ्यावा असें आपल्या मनांत येणें अगदीं स्वाभाविक आहे.

★ ★ ★ अन्यत्र सहसा न आढळणाऱ्या तळहातावरील विविध चिन्हांचें उद्बोधक विवेचन समजण्यासाठीं किंवा

★ ★ ★ ★ आपल्या जीवनांतील भावी घटनांची कल्पना अगाऊ यावी अशी अपेक्षा असेल तर:—

— लिहा अगर समक्ष भेटा —

[ आपलीं फ विषयक
सर्व व ळ. ]

REFBK C010797

REFBK-0010797

ल. क. ताब

"ब्रह्मलिखित" संशोधन केन्द्र

वेस्टर्न इंडिया सदन,

१९७¾ टिळक रस्ता,

पुणें २.




# ल. के. तांबे यांचीं पुस्तकें

## — हस्तसामुद्रिक —

| | | |
|---|---|---|
| १ | ब्रह्मलिखित | ६-०-० |
| २ | करदर्शन | ३-८-० |
| ३ | आत्मसंदेश | १-८-० |
| ४ | भावचित्रें | १-८-० |
| ५ | हातावरील गुपित | ०-१२-० |
| ६ | मनोनिरीक्षणाचें सुलभ साधन | १-०-० |

## — आगामी —

७-८-९-१० सुलभ सामुद्रिक विवेचन भाग १ ते ४

११ सा क्षा त्का र

## — प्रवास वर्णनें —

| | | |
|---|---|---|
| १२ | काश्मीर सहल | १-८-० |
| १३ | श्रीबदरीकेदार-नारायण यात्रा | १-४-० |

## — चरित्र —

| | | |
|---|---|---|
| १४ | श्री. बोरकर महाराजांचें चरित्र | ३-८-० |

पहिली सहा वा त्यापेक्षां अधिक पुस्तकें एकदम विकत घेणारांना टपालखर्च वेगळा द्यावा लागणार नाहीं. ग्रंथालयें आणि पुस्तक-विक्रेते यांना रीतसर कमिशन देण्यांत येईल.

अधिक माहितीसाठीं लिहा:—

ल. के. तांबे

"ब्रह्मलिखित" संशोधन केंद्र, वेस्टर्न इंडिया सदन,

१९७३/४ टिळकरस्ता, पुणें २

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................